|| श्रीनाथ प्रसन्न ||

# 'पुरंदरचे रत्न'


ः लेखक ः

श्री दत्तात्रय नाथा भापकर

लेखक : दत्तात्रय भापकर

पत्ता ः वारूगड,ता. माण, पो. श्रीपालवण
जि. सातारा.

संपर्क ः ९१७२१३१५३६ ९८९२१९६१0२
dattatrya.bhapkar@gmail. com

jyotiram.bhapkar@gmail. com



## || जय महाराष्ट्र ||


**मुखपृष्ठ** : निलेश अगरवाडकर,

**प्रथमावृत्ती** : फेब्रुवारी - २०११

**प्रकाशक** : सौ. स्वाती आर. बोरसे (वास्तुशास्त्रज्ञ)

**मुद्रण** : सौरभ आर. बोरसे

**मूल्य** : ३० रूपये

चित्र : देवेश, कुणाल, सागर

ई आवृत्ती:

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ६ मे २०१७

©esahity Pratishthan®2017

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# : प्रस्तावना :

इतिहासात अनेक शुर-वीर जन्माला आले व आपल्या पराक्रमाची ओळख ठेवून गेले. शिवकाळातही अशा अनेक विरांनी आपला पराक्रम गाजविला. अनेक पडदयासमोर आले, तर काही पडदयामागेच राहिले. त्यामुळे त्यांचा पराक्रम काही कमी होत नाही. अशाच एका विराची ओळख श्री दत्तात्रय नाथा भापकर यांनी आपल्या या ऐतिहासिक कादंबरीतून देण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबरी काल्पनिक कथेवर अवलंबून असली तरी, शिवकालात निर्माण झालेल्या परिस्थितीला अनुसरून "भिकाजी" या विराचे कार्य आहे. सरांना माझ्या हार्दिक शुभेच्छा!

डॉ. के. एस. चिमा

इतिहास विभाग प्रमुख, जी. एन. खालसा कॉलेज, मुंबई

# : ऋणानुर्देश :

माझे आई-वडील, आदरणीय प. पु. बाबा महाराज सातारकर, सन्मा. श्री शिवाजीराव भोसलेसर, सी. जे. एम. हायस्कूल व्यवस्थापन, शिक्षकगण, विद्यार्थी, कु. जोतीराम, श्री गुंजवटेसर व तमाम महाराजांचे चाहते यांचा मी ऋणी आहे.

श्री

बादशहाचा सेहेचाळीसावा वाढदिवस धामधुमीत साजरा झाला होता. परमेश्वरानंतर हिंदुस्थानचा एकमेव मालक म्हणजे औरंगजेबच! अशीच धारणा मोगलांची झाली होती. एकलिंगजी बरोबर त्याच दर्जाच्या व्यक्तींची पूजा ती म्हणजे औरंगजेबाचीच अशी धारणा राजपुतांचीही होती. याच पूजेसाठी आपल्या शिरांना तळहातावर घेऊन राजपुत लढत होते. आन, बान, शान बादशाही सत्तेपुढे झुकत होती.

आजही असाच एक राजपुत औरंगजेबाच्या कृपेचा धनी होण्यासाठी निघाला होता. कोण होता तो? दुसरा कोण? मिर्झा राजे जयसिंग! अंबर-जयपुरच्या प्रभु रामचंद्रांच्या घराण्यात त्यांचा जन्म झाला होता. त्यांची 'कछवाह' घराण्याशीही नाळ जोडलेली होती. अशा या पाक, श्रेष्ठ, तेजस्वी घराण्याचे, वंशाचे वारस असलेले राजे जयसिंग औरंगजेबाच्या मर्जीखातर निघाले होते. काम मोठे विलक्षण कठीण. कोणते? अहो अफजलखान, शाईस्तेखान इ. मोठ-मोठया सरदारांना सहयाद्रीचे पाणी दाखवणा-या मराठयांना ठेचायचे. पहाडच्या चुहयाला पकडून दिल्लीश्वरांच्या पायतळी आणण्याची केवढी मोठी जबाबदारी, कर्तव्यकठीण जबाबदारी! मिर्झा ही पदवी त्यांच्या कर्तबगारीने

मिळाली होती, ज्याचा अर्थ 'शहजादा' म्हणजेच राजे जयसिंगाना शहजादयांचा दर्जा देऊन त्यांचा औरंगजेबांनी मानमरातबच वाढवला होता. याच मानमरातबीला स्विकारून हा पंच्चावन्न वर्षांचा नवजवान (मनाने) सिपेहसालार स्वराज्यावर विशेषतः शिवाजी राजांवर चाल करून येत होता. त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी. स्वराज्याची राखरांगोळी करण्यासाठी. संगती दिलेरखानही होताच हा फक्त मनानेच नव्हे तर शरीरानेही दिलेर होता. म्हणूनच शिवाजीराजांना उध्वस्त करण्यासाठी ही प्यादी औरंगजेबाने स्वराज्याकडे सरकवली.

मजल दरमजल करत ही मोंगली सेना स्वराज्याच्या दिशेने मार्ग क्रमण करत होती. महाराजांच्या हेरांकडून महाराजांना खबरीवर खबरी येत होत्या. अशी अनेक आक्रमणे, संकटे स्वराज्यावर आली होती. त्यांचा उच्छाद मोडून काढण्यात महाराजांना यशही आले होते. परंतु हे संकट फारच वेगळे होते. सुल्तानी होते. आतापर्यंत आलेली मंडळी बुद्धीपेक्षा ताकदीवरच अवलंबून राहणारी होती. आता मात्र बुद्धी व ताकद या दोघांचाही संगम येथे होता. मिर्झा राजे बुद्धीने, चातुर्याने तसेच ताकदीने इतरांना सरस ठरणारे होते. हजारोंची सेना, तोफखाना, उंटांचे तांडे इ. लवाजमा घेऊन गोगलगायीसारखे सरकत होते. हे सैन्य स्वराज्यावर येत होते.

मध्येच इतर सरदार त्यांचे सैन्यही येऊन मिळणार होते. सैन्य कसले समुद्रच तो! स्वराज्याचा गळा घोटण्यासाठी येत होता.

महाराज या काळात बसनूर कारवार प्रकरण उरकून सिंधूदुर्गाची पाहणी करत पुन्हा स्वराज्यात आलेले होते. हेरांकडून विशेष खबरी येतच होत्या. महाराज थोडेसे चिंतेत होते. तान्हाजी, येसाजी, नेताजी इ. खंबीर दिलाचे मित्र व सहकारी महाराजांना चिंतेच्या गर्तेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होते. अशाच एका सकाळी बहिर्जी नाईकांचे आगमन झाले. त्यांच्याबरोबर आणखी एक व्यक्ती होती. ही व्यक्ती बहिर्जींची खास व्यक्ती होती. उंचीने सहा फुटांच्या वर रंगाने काळी-सावळी, गोल मिशा, कमरेला समशेर, पायात वहाणा. अशा भैरवी रूपात महाराजांच्या पुढे सादर झाली. महाराजांनी दोघांनाही बसण्याची आज्ञा केली. महाराजांनी मिर्झाराजांच्या स्वारीविषयी विचारणा केली. बहिर्जी शांतपणे स्वारीविषयी खबर सांगत होता. मध्ये-मध्ये ही व्यक्ती उपयुक्त माहिती पुरवत होती. महाराजांनी सगळी माहिती ऐकून घेतली व त्यांना निघण्याची आज्ञा केली. निघताना अचानक महाराजांच्या मनात काय आले कोणास ठाऊक त्या

माणसाला त्यांनी थांबवून घेतले. ती व्यक्ती थांबली. महाराजांनी प्रश्न केला. 'काय भिकाजी, काय म्हणतेय चिव्हेवाडी? काय म्हणतयं तुमचं घरदार?'

या माणसाचं, योद्धयाचं नाव भिकाजी! बरं का? भिकाजी नाईक. हा मराठयांचा गुप्तहेर बहिर्जीनंतर महाराजांचा दृढ विश्वास होता तो म्हणजे भिकाजीवरच. गेली पाच वर्षे तो महाराजांची तना मनाने सेवा करत होता. पण हा भिकाजी होता तरी कोण? तो महाराजांकडे आला कसा? इतिहास फारच चमत्कारीक आहे.

क–हेपठाराचा परिसर म्हणजे खंडोबारायांचा परिसर. या परिसरातच अनेक उमदया, गबर अशा मराठी मावळयांचा जन्म झाला. या मावळयांच्या साथीनंच महाराजांनी स्वराज्याचं शिवधनुष्य उचलण्याचं ठरवलं होतं. याच परिसरात महाराजांचा आवडता गडही होता. त्याचं नाव किल्ले पुरंदर! पुरंदर म्हणजे इंद्र! इंद्र म्हणजे देवांचा राजा. तसेच हा किल्ला म्हणजे गडांचा राजाच. हयाच किल्ल्याच्या परिसरात, शिवारात अनेक गावं होती. बांदलवाडी, चिव्हेवाडी, वेताळवाडी अशी गावं होती व व्यापा–यांच्या दृष्टीने

भरभक्कम अशी नारायण पेठही होती. विजापुरकर, मोगल यांचे स्वराज्यावर आक्रमण झाले की, या गावांवरही ही धाड चालून येत असे. मुली पळवून नेल्या जात, जनावरे हाकून नेली जात, घरे जाळून, लुटून भस्म होत. पिकांमध्ये जनावरं सोडून हाता तोंडाशी आलेली पीके उद्ध्वस्त केली जात होती. गावातली मंडळी या सुल्तानी संकटांना तोंड देत जगत होती, मरत होती, वाट पाहत होती तारणहाराचीच आणि खरोखरच महाराज तारणहार म्हणून जन्माला आले व मराठयांना जगण्याची अत्युच्च प्रेरणा मिळाली.

याच पंचक्रोशीत चिव्हेवाडी हे गांव होते. पाच पन्नास घरांची वस्ती. हरिजन, कोळी, रामोशी यांचं प्रमाण जास्त होत. याच रामोशांच्या कुळात जन्या बेरडाच्या घरी व तारा बेरडीनीच्या पोटी एका बाळाचा जन्म झाला. तो म्हणजे भिकाजीचा! लहाणपणापासुनच बेडर, भक्कम काळजाचा, रंगाने काळा मात्र मनाने पवित्र! पाच वर्षाचा असतानाच बाप सोडून गेला. लहानपणापासून कुटूंबाची जबाबदारी भिकाजीवर आली. चाकरीसाठी गेले तरी कोणीही नोकरी देत नव्हते. भूक मारून किती दिवस जगणार? दुस-याच्या शेतातनं काहीतरी मागून आणून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवला होता. याच वर्षी त्याच लग्नही झालं होतं.

वय होतं फक्त १३वर्षे, बायको होती ६ वर्षाची. आई, बायको यांना सांभाळताना भिकाजीचा जीव नखाशी आला होता.

अशीच अनेक वर्षे निघून गेली. भिका आता तरणाबांड झाला होता. कुटूंबाला सांभाळता – सांभाळता तो मोठा कधी झाला हे त्यालाही कळलेच नाही. भिका काम – रोजगार शोधण्याचा पुरेपूर प्रयत्न करीत होता. पण कोणीही मजुरीसाठी उभेही करत नव्हते. शेवटी न राहून बाजूच्या गावात जाऊन चोरी केली. भरपूर धन सापडले. त्याला हायसे वाटले. कष्ट करण्याची इच्छा असताना कोणीच काम देत नाही, मग कुटूंब सांभाळायचं म्हणजे असं वाट वेगळी करावी लागणारच. असं तो आपल्या वाईट कामाचं समर्थन करत होता. दररोज नारायण पेठेत, आजुबाजुच्या गावात भुरटया चो–या करून तो त्याचे कुटूंब जगत होते. काही दिवसांत त्याला आणखी तीन साथीदार येऊन मिळाले. एकूण चार समदुःखी रामोशी मंडळी चोरी करता–करता मोठे दरोडे टाकू लागली. पुरंदराच्या या पंचक्रोशीत, परिसरात भितीचं वातावरण पसरलं होतं. दिवसा घराबाहेर निघतांनाही लोक कचरत होते. कुठून तरी ही टोळधाड येईल व आपल्यावर हल्ला करून लुटून नेईल. पत्ता सुद्धा लागणार नाही.

भितीचं, संभ्रमाचं वातावरण सगळीकडे पसरलं होतं. एकतर गरीबी, मोगलांचा, आदिलशाही सैन्याचा हल्ला यांनी हवालदिल झालेल्या रयतेस आता स्वकीयांचंही भय भाजून काढत होते. काय करावं, कसं जगावं? हा प्रश्न लोकांपुढे पडला होता.

एकदिवस याच पंचक्रोशीतल्या काही मंडळींनी भिका व त्याच्या मित्रांची तक्रार पुरंदरच्या किल्लेदाराकडे पुरंदरावर जाऊन केली. त्यांना शब्द दिला, समय दिला तीन दिवसांचा. किल्लेदाराने या कामी बजाजीला धाडले. बजाजीने निवडक लोकांसह घोडयावर मांड टाकून चिव्हेवाडीच्या दिशेने मार्ग क्रमण सुरू केले. दिवसा घरी जाऊनही भिका सापडला नाही. मात्र रात्री चंद्रप्रकाशात लपत छपत डोक्यावर गाठोडे घेऊन भिका घरी परतला होता. संगतीला तीन मित्र होतेच. घरात शिरताच बजाजी व त्याच्या मावळयांनी त्यांच्यावर फासे टाकले व ते पकडले गेले. प्रतिकार भरपूर झाला मात्र बजाजी व त्याच्या मावळयांच्या बळापूढे त्यांचे काहीच चालले नाही. कास-यांनी बांधून भिका व त्याच्या मित्रांना किल्लेदाराने स्वतः न्यायनिवाडा न करता शिवाजीराजांकडे राजगडावर पाठवले. अनेक वर्षे सतावलेल्या जनतेने अखेर सुटकेचा नि:श्वास सोडला होता.

बजाजीने भिका व त्याच्या साथीदारांना सदरेत आणले. महाराज खबर मिळताच सदरेवर आले. महाराज येताच सर्वा ंनी मुजरे केले. भिकाही न कळत वाकला. का कोण जाणे मात्र शिवाजी राजांना बघून, त्यांचं व्यक्तिमत्व पाहून हृदयात आपोआपच चेतना निर्माण झाली व त्या प्रेरणेनेच त्याला झुकावयास प्रेरित केले. महाराजांनी येसाजीकडून भिका व त्याच्या साथीदारांची इत्थंभूत माहिती विचारली. आज सर्व घडामोडी वेगळयाच घडत होत्या. दरोडेखोराला समोर पाहतांना सुद्धा महाराज रागावलेले, क्रोधीत दिसत नव्हते. ते शांत होते. का? अहो, महाराजांचा स्वभावच तसा होता. ते प्रसंग, व्यक्ती ओळखूनच क्रोधीत होत. सर्वांना दरोडखोरांची टोळी दिसत होती. मात्र महाराजांना त्यांच्यातील मराठयांचे भावी सरदार दिसत होते. समोरचं माणूस ओळखण्याची त्यांची नजर अफलातून होती. त्यांची गुणग्राहकता अप्रतिम होती. भिकाच्या गरिबीचं, दरोडेखोर बनण्याची कहाणी महाराजांनी भिकाकडूनच जाणली. महाराज शांतपणे ऐकून घेत होते. सदरेवर सगळीकडे शांतता पसरली होती. आता महाराज या चौघांना कोणती शिक्षा करणार हात-पाय तोडण्याची, गर्दन काटण्याची की कडेलोट. भिकालाही पहिल्यांदाच घाम फुटला होता.

मनात डर पैदा झालं होतं. आता आपली सुटका नाही हे मनोमन त्याने ओळखले. शेवटी महाराजांनी मौन सोडले व सरळ एक प्रश्न केला. भिका आमच्या स्वराज्याला तुझ्यासारख्या निडर, शुर, इमानी, मर्द अशा मावळयांची गरज आहे. स्वराज्याच्या या कार्याला तुझी मदत मिळेल का? सर्वांचे चेहरे बघण्यासारखे झाले. भिका तर भांबावूनच गेला. त्याला काय म्हणावे हे सुचेनासे झाले. महाराज उत्तराची अपेक्षा ठेवून होते. भिकाने स्वतःला सावरले व कास-यासकट महाराजांच्या पायावर लोळण घेतलं. त्याला स्वर्ग दोन बोटेच उरला. आणि शिवाजी महाराज म्हणतात ते हेच! अशी ओळख पटली. त्यांनी नेत्राश्रूंनी महाराजाच्या पायांवर जलाभिषेक घालत चटकन होकार दिला. त्याच्याबरोबर त्याचे तीन साथीदारही महाराजांच्या स्वराज्यासाठी आपल्या शरीराच्या पायघडया घालायला तयार झाले. चौघांना आपल्या पोटाची खळगी भरण्याबरोबरच मानसन्मान मिळणार होता. त्यामुळे ते महाराजांकडे सर्वस्व अर्पण करण्यासही तयार झाले होते. सदरेवर सगळयांनाच आनंद झाला. पंत व मॉसाहेब निहायत खुश झाले. महाराजांनी नियुक्ती केली होती, स्विकार केला होता. आता मगदूर पहायचा शिल्लक होता.

असेच काही दिवस गेले. राजगडावर राहून भिका मनापासून महाराजांची सेवा करत होता. निहायत खुश होता. महाराजांनी एक दिवस अचानक त्याला चिव्हेवाडीला जाऊन कुटूंबाची भेट घेण्यास सांगितले. महाराज असेच होते. एखादयाच्या हृदयातील उलघाल त्यांना जाणवत असे. खूप दिवसांपासून भिका आपल्या कुटूंबापासून दूर आला होता मनातनं घरी जाण्याची इच्छा होती. परंतू महाराजांची इच्छा सांभाळणे गरजेचे होते ना आणि शेवटी मायसारख्या काळीज असणा-या महाराजांनी ती मनाची भावना ओळखली व त्याला काही दिवसांसाठी घरी जाण्यास मुभा दिली. दुप्पट उत्साहाने भिकाजी व त्याचे साथीदार चिव्हेवाडीच्या दिशेने वाटचाल करू लागले. काही घटकांच्या मार्गक्रमणानंतर चौघेही चिव्हेवाडीच्या शिवारात आले. चिव्हेवाडीत हे चौघे आल्याची खबर मिळाली. सगळीकडे पळापळ सुरू झाली. त्यांना वाटले महाराजांच्या कैदेतनं सुटून हे चारही दरोडेखोर आले. आता आपली धडगत नाही. महाराजांकडे आपणचं तक्रार केली आता हे यमाचे दूत आपला पूर्ण निपा:त करणार. अशी भिती प्रत्येकाच्या मनात वधारली होती. काय करावं? कुठं लपावं? काय-काय वाचवावं? असे अनेक प्रश्न प्रत्येकाला पडले होते. एवढयात चारही जण गावात आले व कोणत्याही

प्रकारचा धुमाकुळ न घालता आपापल्या घरी निघून गेले. लोकांना या प्रकाराने आश्चर्यच वाटले. तरी मनातली भीती कमी होत नव्हती. शेवटी एक सत्य बाहेर आले. ते म्हणजे आता हे चारही दरोडेखोर राहिले नाहीत तर शिवाजी महाराजांचे सरदार व विशेष गुप्तहेर बनले आहेत. ही खबर वणव्यासारखी सगळया चिव्हेवाडीत पसरली. मनातली भिती ओसरली व आदराची भावना वाढीस लागली. काही वेळातच अख्खी चिव्हेवाडी या चौघांच्या घरी आली व आदराने विचारपूस करू लागली. सर्वांनी स्वराज्याला वाहून घेतल्याबद्दल कौतुकाचे महाल बांधले. असेच काही दिवस राहून चिव्हेवाडीची आठवण उराशी बाळगत पुन्हा हे चौघे महाराजांकडे परतले. मनात घराविषयी कळवळा होता. परंतू स्वराज्याची भूकही होती. अखेर या स्वराज्याच्या भूकेने घरे गोतावळा विसरायला भाग पाडले. काळीज महाराजांना केव्हाच अर्पण झालं होत आता शरीर अर्पण झालं. आता जगणं, मरणं, महाराजांसाठी, स्वराज्यासाठी!

दिवसामागून दिवस सरले. मासामागून मास उलटले. स्वराज्याची अनेक कामे अर्धवट होती. त्यांच्या पूर्त तेसाठी धन, संपत्तीची गरज होती. काही महिन्यांपूर्वीच औरंगजेबाचा मामा शाईस्तेखान आपल्या लाखोंच्या फौजेसह

स्वराज्यात आडवा नाचून गेला होता. त्यांच्या फौजांनी हा मुलूख बेचिराख केला होता. सगळीकडे अंधार पसरला होता. आता गरज होती प्रकाशाची! हो आणि हा प्रकाश राजांच्या विचाराधीन होता. प्रत्येकाला वाटत होते महाराजांनी अशी काही युगत काढावी की, मोगलांनी घडवून आणलेल्या विनाशाची भरपाई केली जावी. महाराजांच्याही मनात हाच विचार घर करून बसला होता. ते योग्य संधीची व जागेची निवड करण्याचा विचार करत होते. अचानक संधी व जागा महाराजांपुढे साक्षात हात जोडून उभ्या राहिल्या संधी होती धनप्राप्तीची व ठिकाण होते सूरत! सूरत म्हणजे चेहरा कोणाचा? मोंगली सत्तेचा, सूरत म्हणजे सुंदरता, सूरत म्हणजे धनधान्याचे आगर, सूरत म्हणजे औरंगजेबाची शान, सूरत म्हणजे रावणाची दुसरी लंका, सूरत म्हणजे औरंगजेबाचे नाक. महाराजांनी औरंगजेबाचे नाक कापून तिथली संपत्ती लुटण्याचाच बेत आखला होता. केवढे भयंकर दिव्य हे! स्वराज्यापासून शेकडो मैल असलेल्या मोंगली नाक्यावर हल्ला करायचा. हल्ला करून संपत्ती धन लुटून तेवढयाच तातडीने परत स्वराज्यात दाखल व्हायचे. मनसुबा साधणे कठीण. परंतु इतरांना कठीण वाटणारी कामे महाराजांना साधारण वाटायची. सूरत लुटायची म्हणजे सूरतेची खडानखड़ा माहिति

अगोदरच मिळवावी या उद्देशाने महाराजांनी बहिर्जी नाईक व भिकाजी नाईक व त्यांच्या हाताखाली असलेल्या गुप्तहेरांच्या चमूला सूरतेवर धाडले. बहिर्जी कार्यक्षम, कुशल, तीव्र बुद्धिमान असा गुप्तहेर होते. कोणतीही योजना आखण्यात तो पटाईत होता. आता त्याच्या शक्तीला, बुद्धीला साथ मिळाली होती भिकाजी नाईकाची! मग काय बिशाद आहे? सूरतेतल्या बुद्धिवंतांची, सामर्थ्यवंतांची. दोन नाईकांच्या पुढे सूरत संपूर्ण बेपर्दा होणार यात काही शंकाच राहिली नव्हती.

सूरतेच्या योजनेच्या प्रारंभी महाराजांनी दोघांना काही सुचना दिल्या होत्या. लहान व्यापा-यांपासून मोठया, धनाढय, रईसजादा तुर्रमखान अशा व्यापा-यांची सूक्ष्मातीसूक्ष्म माहिती काढावी. मोठया व्यापा-यांच्या घरांतील लोकांचीही माहीती मिळवावी. त्याचप्रमाणे इनायतखानाच्या प्रत्येक कारभारी व अधिका-यावर नजर ठेवून, इनायतखानावर कडक, तीक्ष्ण, करडी, नजर रोखून धरावी. त्याचा दिनक्रम, किल्ल्याची स्थिती, फौजफाटा इ. माहिती मिळावी अशी महाराजांची इच्छा होती. सर्व सूचना घेऊन दोन्ही नाईकांनी निघण्याची तयारी सुरू केली.

महाराजांची आज्ञा प्रमाण मानून तसेच भिकाजीची साथ घेऊन बर्हिजींनी मार्गक्रमण सुरू केले. काही कालावधीतच ते दोघे तसेच काही ठराविक हेर मंडळी सूरतेत दाखल झाली. योजना सफल करणे हे प्रत्येक हेरावर अवलंबून होते. त्यामुळे प्राणाची बाजी लावून, अकलेची दालने उघडून महाराजांसाठी, स्वराज्यासाठी हेरगिरी सुरू केली. एका आठवडयाच्या आतच महाराजांना बहिर्जीने सूरतेच्या धनसमुद्राची माहिती दिली. महाराज निर्धास्त झाले. आता मोहिम एकच ध्येय, एकच ठिकाण, एकच धनसागर, हजचे दार अर्थात सूरत! महाराजांनी लवाजम्यासह सूरतेवर नजर फिरवली. त्या नजरेत प्रेम नव्हते. राग होता, कोप होता, बदला होता. शाईस्तेखानाच्या लोकांनी केलेल्या स्वारीचा, आता सूरतेचा पूर्ण नि:पात होणार यात शंकाच राहिली नाही कारण तो कोप होता साक्षात शिवाचाच! सांभाळा रे बाबांनो! वाचवू शकला, तर वाचवा स्वत:ला, सूरतकरांनो, असाच सूर मेघमंडळातून निघत होता. घोडयांची फौज त्र्यंबकेश्वर मार्गाने सूरतेच्या शिवारात दाखल झाली. फौज डेरेदाखल झाली. महाराजांसाठी खास तंबू, सहका-यांसाठीही ठराविक तंबू अशी मुक्कामाची तयारी झाली. फौज स्थिरावली.

महाराज सिंहासनावर स्थानापन्न झाले. वाट पहात होते ती बर्हिजींची.

संध्याकाळ झाली होती. एक म्हातारा व्यापारी महाराजांच्या तंबूत काठी टेकत आत आला. त्याला कोणीच अडवले नाही. असे का? अहो! हा म्हातारा दुसरा तिसरा कोणी नसून बहिर्जीच होते. मुजरा केला गेला सिंहासनाजवळ महाराजांच्या चरणांवर गालिच्यावर बर्हिजी बसले. तेवढयात अचानक एक माणूस आत आला कोण होता तो? अहो, भिकाजी नाईक आला होता. दोघेही महाराजांना आपआपल्या खबरा देत होते. महाराज दोघांच्याही खबरा, माहितीची काटेकोरपणे दाद देत होते. प्रत्येक शब्द कानांच्या ओंजळीत साठवून घेत होते शेवटी सगळया खबरा देऊन झाल्या. आतापर्यंत महाराज अवाक्षरही बोलले नव्हते. दोघा नाईकांनी आपला कारभार उरकला होता. आता महाराजांच्या मुखकमलाकडे दोघांचे लक्ष लागले होते. महाराज यांवर काय बोलतात? कोणत्या योजना सांगतात? यावर त्यांचे लक्ष होते आणि शेवटी महाराज बोलू लागले दोघेही टवकारले महाराजांनी योजना सांगण्यास सुरूवात केली. प्रथम मोठया व्यापा-यांना, धनाढय, श्रीमंत लोकांना लुटण्याचे ठरविले. दुकाने, घरे जिथे मिळेल तेथून संपत्ती मिळवण्यास सांगितले.

खंडणी देणाऱ्यास इजा न करण्यास सांगितले. तसेच स्त्रीया, वृद्ध, बालक, धार्मिक स्थळे यांना धक्का लागता कामा नये असा दंडक घातला. शेवटी इनायतखानावर इनायत करण्यास सांगितली. त्यालाही पुरते लुटण्यास सांगितले व मोगलांना शिवाजी काय पाणी आहेत हे दाखवण्यास सांगितले. हे पाणी इनायतखानास थोडेच पचणार होते, पण प्रयत्न करण्यास काय हरकत? असा प्रयत्न यापूर्वी अफजलखान शाईस्तेखान यासारख्या मातब्बर सेनानींनी केला. परंतु पाणी महाभयंकर आहे असे म्हणत एक अल्लाला प्यारा झाला व एक बंगाल प्रांती तोबा-तोबा करत पळाला. आता बारी इनायतखानाची. संपूर्ण योजना ऐकून घेऊन दोन्ही नाईक बाहेर आले. आता तयारी होती सूरतेच्या लुटीचीच. तान्हाजी, येसाजी, कुडतोजी, नेताजी असे अनेक वीर सूरतेवर धावून जाण्यास तयार झाले. महाराजांनी पाठवलेल्या पंतांचे आगमण तेवढयात झाले. महाराजांची खंडणी देण्याची आज्ञा धुडकावून लावल्याची खबर पंतांनी दिली. महाराजांचा संयम ढळला. आता एकच आक्रमण!

तान्हाजी, कुडतोजी, नेताजी, येसाजी, बर्हिजी, भिकाजी यांनी घोडी दामटली. सूरतेच्या गल्ल्यांतून हाहा:कार माजला. आरडा-ओरड, वाचवण्याचा आक्रोश उमटला.

रक्ताचा सडा पडला. परंतु खंडणी न देणा–यांचा. ज्यांनी खंडणी दिली त्यांच्या केसालाही धक्का लागला नाही. धन लुटले जात होते. पोत्यांत, भांडयांत भरून धन महाराजांच्या चरणांवर ओतले जात होते. लक्ष्मीला स्वराज्याच्या दारात आणून दाखल केले जात होते. महाराज खूश होते. सगळेजण पराक्रमाची शर्थ करत होते. भिकाजी आज दरोडे टाकत होता. यापूर्वीही त्याने बरेच दरोडे टाकले होते पण ते स्वार्थासाठी आजचे दरोडे राजांसाठी स्वराज्यासाठी. काय खूश होती स्वारी! धर की तोड दरवाज्यावरचं कुलूप, लुट आतलं धन. नुसती तारांबळ उडाली होती भिका व त्याच्या साथीदारांची. काय करू, काय लुटू माझ्या राजांसाठी अशीच भिकाजीची भावना होती. इनायतखान हे सगळे बघून खजील झाला होता. तो आपले काही सैन्य घेऊन सूरतेच्या किल्ल्यात जाम झाला. ही खबर भिकाजीने अगदी रंगवून महाराजांना सांगितली. महाराजाच्या चेह–यावर हास्याची लकेर उमटली.

मनसोक्त, मनमुराद सूरतेची लूट चालली होती. इंग्रज, डच, फिरंगी, अफगाणी व्यापारी, काही परदेशी व्यापारी यांनाही प्रेमाने खंडणी देण्यास विनंती केली. ज्यांनी खंडणी दिली त्यांना मुक्त केले.

नकार देणा–यास पुरते लुटले. फक्त अंगावरचेच शिल्लक ठेवले. धनाच्या राशीच्या राशी महाराजांच्यासमोर रचल्या गेल्या होत्या. महाराज आपल्या हेरांवर, सेनानींवर बेहद् खुश होते. अपरिमीत खुश होते. आता शेवटी स्वराज्याकडे वाटचाल सुरू झाली. महाराजांनी बर्हिजी व भिकाजीला सैन्याच्या पुढे काही कोसांवर पाठवले होते. कारणही तसेच होते. खबरांवर खबरा दिल्ली निवासी, सर्वसत्ताधिश, आलमगिरी बादशहा, दिल्लीश्वर औरंगजेबापर्यंत पोहचल्या होत्या. त्यांचा जळफळाट झाला होता. सिंहासनावर बसून हातपाय खुडत होता. आतापर्यंत शिवाजीचा हात मानेपर्यंत गेला होता. आता तर त्याने आपले नाकच कापले असा विचार त्याच्या मनात आल्यावाचून राहिला नाही. एवढयावर तो शांत बसणारा नव्हता. लगेच हुकूम देऊन एक फौजेची तुकडी सूरतेवर शिवाजीमहाराजांनी पाठवली होती. औरंगजेबाचा थोरला चिरंजीव अकबर त्यावेळी औरंगाबादेत (खडकीत) होते. त्याचा म्हणावा तसा धोका नव्हता परंतू काळजी घेणे महाराजांना योग्य वाटले म्हणूनच बहिर्जी व भिकाजी महाराजांच्या सैन्यापूढे हालहवाला घेत खबरी मिळवत, चाखाचोळा बघत मोगलांच्या सैन्याचा कानोसा घेत निघाले. वेळोवेळी भिकाजी बहिर्जीच्या सुचनांचे पालन

करून महाराजांना खबरी देत होता. पुढील मार्गाची रूपरेखा समजावीत होता. महाराज व सैन्य दोघांच्या मार्गदर्शनानूसारच नासिक, त्र्यंबकेश्वर मार्गे स्वराज्यात प्रवेशले. स्वराज्यात प्रवेश म्हणजेच स्वर्गात प्रवेश. महारांजाबरोबर सर्वांनाच हायसे वाटले. आनंद उचंबळून आला. लाखो रूपये, जड–जवाहीर, मोहरा, सोनं–नाणं, चांदी इ. लूट या सूरतेत मिळाली होती. स्वराज्याच्या बालकास बाळसं धरायला बाळगुटीच मिळाली होती.

महाराज प्रसन्न होते. त्यांची मुद्रा चैतन्यशील वाटत होती. महाराजांनी आपल्या सैनिकांची पाठ थोपटावी म्हणून विशेष सभा बोलावली होती. छोटया सैनिंकापासून सेनापती, पंत, वाकनिसांपर्यंत सर्वांचीच खूप तारीफ महाराजांनी केली होती. सर्वांना त्यांच्या कामगिरीनूसार, पात्रतेनूसार, मानाबरोबर, स्तुतीबरोबरच धनानेही पुरस्कृत केले होते. या सर्वात आज भिकाजीही भयंकर खुश दिसत होता. आपल्या जन्माचं सार्थक झालं असचं वाटत होतं. त्याला स्वर्ग दोन बोटं उरला होता. महाराजांनी बहिर्जीबरोबर त्याचीही विशेष तारीफ केली होती. त्याला सोन्याचा तोडा, तलवार अर्पण केली होती. भिकाजीने ती जीवाच्या ओंजळीत स्विकारली. या तलवारीच्या जोरावरच तो आता जीवनात येणा–या

संकटांना, शत्रूंना कंठस्नान घालण्यास समर्थ झाला होता. मोहिम संपुष्टात आली होती. महाराज शांत व स्वस्थ होते. काही काळ आरामात गुजारावा अशी त्यांची कामना होती. म्हणून ते शांततेत मनशांती मिळवण्याचा प्रयत्न करत होते. इकडे सध्या जास्त कामगिरी नसल्याने भिकाजी महाराजांची आज्ञा घेऊन चिव्हेवाडीला जायला निघाला होता. सोबत साथीदार होतेच. घोडयावर मांडा टाकून ही मंडळी चिव्हेवाडीकडे दौडत निघाली होती. आज वा-यालाही लाजवेल असा वेग त्यांच्या घोडयांना होता. काही काळातच ते चिव्हेवाडीत दाखल झाले. चिव्हेवाडीत पोराबाळांपासून म्हाता-यांपर्यंत खबर पसरली. भिकाजी व त्याचे साथीदार आल्याची खबर येताच गावात आनंदाचा सागर उचंबळून आला. भिकाच्या कारभारणीने त्याचे औक्षण केले. त्याच्यासह त्याच्या साथीदारांची दणक्यात मिरवणूक काढली. भिकाजी भरून पावला होता. दहा वर्षांपूर्वीचा भिकाजी दरोडेखोर, लुटेरा, डाकू होता. आजचा भिकाजी सेनानी, शूर, महाराजांचा सेनानी होता. जमीन-अस्मानाचा फरक होता तो!

अनेक दिवस तो चिव्हेवाडीत राहिला. लहान पोरांना तो तलवार चालवण्याचे प्रशिक्षण देत होता. घोडयावर बसणे,

पोहायला शिकणे, भालाफेक, कुस्ती अशा नानाविध कलांचे मार्गदर्शन तो आपल्या गावातल्या तरूण मंडळींना करून देत होता. एक छोटीशी फौजच त्याने त्या काळात तयार केली होती. फौज ती केवढी मोठी! १५ ते २० जणांची परंतू जीवाला जीव देणारी, राजासाठी प्राण अर्पण करणारी, स्वराज्यासाठी संसारावर तुळशीपत्र ठेवणारी होती. जर संकट आले तर, भिकाजीच्या नेतृत्वाखाली महाराजांसाठी लढण्यास ते तयार झाले होते. हीच फौज पुढे पुरंदरावर महाराजांसाठी लढली, स्वर्गास गेली, पण दिलेरखानापुढे झुकून नाही तर, ताठ मानेने स्वर्गाच्या पाय-या चढत गेली. अशी होती ती भिकाजीची लाजवाब फौज!

काही दिवस शांततेत निघून गेले. स्वराज्यात जास्त उलाढाली झाल्याच नाहीत. पण ही शांतता वादळापूर्वीची होती. समुद्रात जर वादळ येणार असेल तर तो शांत होतो व अचानक गगनभेदी ललका-या, कर्णबधिर करणा-या किंकाळया फोडत रोरावत गर्जना करू लागतो. क्षणात वातावरणात गांभिर्य व भीती निर्माण करतो. अशीच ती शांतता होती. परंतू काही काळच ती टिकली. कारण पुन्हा एकदा स्वराज्यावर औरंगजेबाचा मोहरा स्वराज्यावर आक्रमण करण्यास लाखो सैनिकांचा समुद्र घेऊन चालून येत होता.

राजांचा काळ बनण्यास येत होता. राजांना नेस्तानाबूत करून स्वराज्य, स्वधर्म बुडविण्यास येत होता. परका नव्हता तर स्वकीय, आपल्याच रक्ताचा होता. आणखी जवळचे सांगू? अहो, पूजनीय अशा रामप्रभूंच्या वंशातला होता. चरकलात ना? इतिहासही असाच चक्रावून गेला. मोगलांनी आक्रमण केले तर ते परकियच समजून त्यांना धडा शिकवायची हिंमत मराठयांत होती. परंतू आपलचं रक्त जेव्हा आपल्याच मुळावर उठते, तेव्हा त्याला काय म्हणायचं? काय करायचं? कोणता उपाय योजायचा? ते काहीही असो, स्वराज्याचा शत्रू म्हणजेच आपला शत्रू. मग तो परकिय असो की स्वकीय त्याला संपवणे हे आमचे आद्यकर्तव्यच.

स्वराज्याचा बिमोड करण्यास मिर्झाराजे जयसिंग दिलेरखान अनेक सरदारांसह चालून आले. महाराजांना बहिर्जीनी खबर पोहचवली. महाराज थोडेसे विचलीत झाले. बहिर्जीला मिर्झाराजे व मोगलांच्या फौजेच्या खबरा आणण्यास धाडले गेले. इकडे सुखा–समाधानात दिवस व्यतीत करणा–या भिकाजीला स्वराज्यावर आलेल्या संकटाची जाणीव झाली. महाराजांची मुर्ती त्याच्या डोळयांसमोर उभी राहिली. ती चिंतातूर मुर्ती पाहून तो भांबावला. साथीदारांना त्याने लगोलग बोलावले व पत्नीचा निरोप घेत ही मंडळी महाराजांकडे

राजगडाकडे सरकली.

मिर्झाराजे, दिलेरखानासह पुण्यात दाखल झाले. दाखल झाले ते आपल्या राक्षसी, पाशवी सेनेसह. मिर्झाराजांच्या प्रत्येक इशाऱ्यावर फौजेची बांधणी व कार्याची आखणी चालली होती. संध्याकाळची वेळ होती. मिर्झाराजे, दिलेरखान, कुतुबुद्दीन, इहतशामखान अशी खाशी मंडळी बसली होती. चर्चा, मंथन चालले होते. चर्चेतून समाजकार्य साधले जाते त्याला समाजकारण व ज्याच्यातून राजकीय विचार मांडले जातात त्याला म्हणतात राजकारण. हे राजकारण होते. फक्त मिर्झाराजांसाठी, खानांसाठी गजकरणच! तुम्ही म्हणाल असं का? अहो, खानांनी कितीही डोकं खाजवलं तरी त्यांच्या बुद्धीची झेप शिवाजीराजांच्या अटकेपर्यंत अथवा त्यांच्या मृत्यूपर्यंतच थडकत होती. म्हणून ही चर्चा राजकारणाची नव्हे तर गजकरणाची होती. हया खलबतखान्यात भविष्यात होणारी स्वराज्याची राखरांगोळी कशी करावी याचे मनसुबे आखले जात होते. शिवाजी राजांना परास्त करून अथवा मृत्यूलोकी धाडून त्यांचे शीर इस्लामच्या रखवालदार असलेल्या औरंगजेबाच्या चरणावर अर्पण करण्याचाच घाट घातला जात होता. मिर्झाराजे खासे राजपुत ते अविचार करणारे नव्हते. अन्याय, अनीती व दुर्बुद्धी यांना

त्यांच्या राजकारणात थारा नव्हता. मोगलांबरोबर राहून त्यांनी सत्याची कास सोडली नव्हती. भांगेत जशी तुळस अथवा लंकेत बिभीषण तसे मोगलांच्या गराडयात 'मिर्झाराजे जयसिंग'. चर्चा परमोच्च बिंदूला पोहचली होती. चर्चेतून एक-एक मुद्दा गाठी सोडल्यासारखा मोकळा होत होता. मिर्झाराजांचा उद्देश स्पष्ट होता. शिवाजी राजांचा मोकळा प्रदेश प्रथम जिंकून घ्यावा तसेच किल्ल्याला पुरविली जाणारी रसद तोडली जावी म्हणजे शिवाजी व शिवाजीचे लोक आपोआप शरण येतील. एक-एक किल्ला लढविणे व जिंकून शिवाजीला जिंकणे. षडरिपूंना जिंकण्यासारखे कठीण!

दिलेरखानाची योजना कार्यान्वित होऊ लागली. दिलेरखानाच्या योजनेनूसार तो सैन्य घेऊन मार्गक्रमण करू लागला. शिरवळच्या पुढे आल्यानंतर त्याला माहिती मिळाली ती पुरंदर किल्ल्याची तोलदार, बुलंद, रेखीव, तोडीचा, भरभक्कम किल्ला म्हणजे पुरंदरच! पण एकटाच नाही, एक-दोन जुळे भाऊ जवळ-जवळ पंगतीला बसलेले होते. एक पुरंदर व दुसरा रूद्रमाळ अथवा वज्रगड हेरांनी पुरेपूर खबर दिलेरखानाला दिली व मिर्झाराजासह त्याने सैन्याचा मोर्चा वळवला तो पुरंदराकडेच (१५ मार्च, १६६५)

हा किल्ला पुण्यापासून बरोबर जवळपास १२ कोसांवर आग्नेयला. ही राक्षसी सेना निघाली ती पुरंदरची मोहीम पार पाडायला म्हणजेच पुरंदरला नेस्तनाबूत करायला.

पुरंदरावर जीवाचा आकांत करत रोरावत हे वादळ सरकत होतं. तर मिर्झाराजांच्या आज्ञेनुसार स्वराज्यावर चौफेर हल्ले चालूच होते. जागोजागी लष्करी तळ बसवून जनता नाडली जात होती. स्वातंत्र्यावर, स्वराज्यावर घाला घातला जात होता. पुणे, चाकण, लोणी, लोहगडाच्या पायथ्याशी असलेला मुलूख जुन्नर, सुपे तसेच शिरवळ प्रांतात धूमाकूळ घातला जात होता. स्वैराचार चालला होता. रयत त्रस्त झाली होती. जनावर पकडून नेली जात होती. मुले, माणसे ओढून नेली जात होती. मुली पळवून नेल्या जात होत्या. त्यांच्यावर अत्याचार होत होते. देवळांचे पाविञ्य धोक्यात आले होते. अनेक ठिकाणी मंदिरांना बाधा पोहचवली जात होती. देव नद्यांच्या पात्रात बुडवले जात होते. सगळीकडे हाहाःकार माजला होता. जनता त्राही त्राही करत होती. आता स्वराज्याची घटका बुडाली असा भास होऊ लागला होता. मिर्झा राजांच्या प्रत्येक चालीची व सैन्याच्या आक्रमणाची खडानखडा खबर बहिर्जी व भिकाजी देत होते. महाराज चिंतेने ग्रासले होते. काय करावे हे समजत नव्हते.

आता पर्यंतच्या संकटांपेक्षा हे संकट मात्र भिन्न होते. येथे युक्तीचा व शक्तीचा उपयोग ही ठरणार असे महाराजांना वाटत होते. शिवाजी महाराजांचे खलबत खान्यातील वास्तव्य वाढत चालले होते. बाहेरून येणारी मंडळी दररोज नवनवीन खबरी आणीत होते. माँ साहेब, महाराज, तान्हाजी, येसाजी, बाजी, बहिर्जी, भिकाजी अशी खास मंडळीही चिंतातूर नजरेने एकमेकांकडे पाहून माना खाली घालत होती. महाराजांवर अशी संकटे अनेक आली. परंतू आधार एकच तुळजाभवानी. महाराजांनी तुळजाभवानीला साकडे घातले. आता हे दु:ख निवारण्याचा कौल दे; माते, हे बालक तुझ्या चरणाशी आलयं, अभय दे! भवानीमाताही शांतच होती. नक्कीच तिच्या मनातही खळबळ माजली असेल.

कुतूबुद्दीन खान सात हजाराची फौज घेऊन जुन्नरपासून लोहगडापर्यंत तलवार नाचवत होता. मावळात येऊन जनतेला नाडत होता. इहतेशामखानास पुण्याचा सुभा दिला होता. सोबतीला रणदौलतखान, बीरमदेव सिसोदिया यांच्यासारखे कडवे रजपूत सरदार व ४००० कडवी फौज होती. कर्यात मावळ, भोर मावळ, खेडेबारे, कानद खोरे, पौड मावळ या प्रांतात हजारो मोंगल लुटालूट करत होते. हे अस्मानी संकट आता विनाशाचे दुसरे रूपच भासत होते.

लोकांचे संसार उघडे पडले होते. पिढयान्पिढया बरबाद होत होत्या. खेडी उद्ध्वस्त होत होती. जमिनी नापीक होत होत्या. राक्षसी घाला घातल्यावर लोकांनी कोणाकडे जायचे? अहो, आहे एक शक्ती, शिवशक्ती! तिचीच आण भाका निश्चित ती पावेल. अहो! सुख दु:ख देवालाही होतेच. असं दु:ख आलं तरी, गर्भगळीत होऊ नका. यातुनही शिवाजी राजे मार्ग काढतील. तिमीरांत नक्कीच होईल. आता वाट पाहायची ती त्या सुर्योदयाची, स्वातंञ्याच्या सोनेरी किरणांची!

मजल–दरमजल करत दिलेरखानाची फौज नारायणपेठेजवळ आली. समोर लक्ष गेले ते पुरंदराकडे. दिलेरच्या तर जिभेला पाणीच सुटले. काहीही करून हा गड जिंकायचाच. असा निर्धारच त्याने केला.

क–हेपठाराच्या एका टोकाला हा किल्ला वसलेला, शिवप्रभूंचे ध्यानस्त रूपच. किल्ले पुरंदराच्या रूपात वसलेले होते. परिसराची सुंदरता, नारायणपेठेची रेखीव रचना एका बाजूला. आवळा–जावळा वज्रगड जवळचं मराठयांचं आद्यदैवत खंडोबा, काय वर्णावं त्या प्रदेशाचं रूप? किती नजरेत साठवावं त्याचं लावण्यं? चंद्राला पाहून जसं लहान बाळानं मोहित व्हावं व त्याचा हव्यास धरावा, तसा हट्ट

दिलेरखानानं चालवला होता. तो उतावीळ होता. हाता–पायांची घालमेल चालली होती. जिवाची तगमग चालली होती. पुरंदरासाठी स्वत:च्या स्वार्थासाठी! ते कसे? पुरंदर स्वतःच्या हिंमतीने जिंकला तर, औरंगजेब बादशहा खुश होई ल, त्याला लोणी लावून बादशहासमोर अदब, मानसन्मान वाढेल हा त्याचा मानस होता. पण मानस मिर्झाराजांसमोर बोलून दाखवण्याची हिंमतही नव्हती व मनातलं गुपित फोडण्याची तशी गरजही नव्हती. तो दाढीतल्या दाढीत नाजूकपणे हसत होता. त्याला घमेंड होती. स्वत:च्या कर्तृत्वाची, कौशल्याची, युक्तीची, आपल्या शेरदिल बहाद्दर सरदारांची तोडीस तोड असणा–या सैन्याची या पुंजीच्या जीवावर मी पुरंदरच काय स्वर्गही जिंकू शकतो अशी भावना त्याची झाली होती. त्याचा गर्वाचा फुगा भरभर फुगत चालला होता. आता वाट पाहायची ती फुगा फुटण्याची!

दिलेरखान मिर्झाराजांच्यापुढे आला होता. नारायणपेठेपासून ते पुरंदराच्या पायथ्यापर्यंत सैन्याच्या राहुटया व तंबू बसले होते. पावसाळयातल्या कुञ्याच्या छञ्याच जणू. दिलेरखानने पुरंदरच्या पायथ्याशी तळ ठोकला होता. त्याचा आलीशान तंबू मिजाशीने उभा होता. पुरंदरच्या काळयाकभिन्न संभारापुढे हिरव्या व सफेद रंगांची उधळण

झाली होती. काहीही करून किल्ला हाती आलाच पाहिजे या विचाराने पछाडलेल्या दिलेरखानाने पुरंदरावर, वज्रगडावर तोफांचा, बंदुकांचा, दुक्क्यांचा मारा सुरू केला. किल्ल्यावर तोफा आग ओकू लागल्या. किल्ल्यावरील मंडळींना पहिली सलामी मिळाली. मोठमोठया आवाजात तोफा ओरडत होत्या. वरील मंडळीच्या मनात थोडीसी धास्ती निर्माण झाली. खानाचा जोश अपरिमीत होता. जोशाने, द्वेषाने, रोषात त्याने आक्रमण करण्याचा हुकूम सोडला होता. बंदूकीच्या फैरी झडत होत्या. तोफांना पलिते लावणे चालूच होते. वरूनही तोफांना आता उत्तर मिळू लागले. खानाच्या कानाखाली जाळ निघावेत असे तोफांचे आवाज किल्ल्यांवरूनही ऐकायला मिळत होते. खानालाही थोडीशी जरब बसली.

हळूहळू मिर्झा राजांचीही फौज तेथे दाखल झाली. (३१ मार्च, १६६५)परिसरात मिर्झाराजांनी नारायण पेठेजवळच मुक्काम ठोकला. त्यांचा तंबू तेथे ठोकला गेला. नारायणपेठेजवळ एक शिवभक्त आला होता. कशासाठी? शिवावतारी शिवाजी महाराजांचा स्वराज्याचा खेळ उद्ध्वस्त करायला. दिलेरखानाच्या प्रत्येक घडामोडीची त्यांना वरचेवर खबर मिळत होती. त्यांनी दिलेरखानास मुक्त

सोडले होते. तो मनाला वाटेल ते निर्णय घेण्यास दिलेर सक्षम होता. मिर्झाराजांच्या आगमनाची खबर मिळताच तो धावतच मिर्झाराजांकडे आला. कुर्निसात करून त्याची योजना समजावून सांगितली. मिर्झाराजांनी त्याला होकार दिला. आता पुढील योजना आखण्यास दिलेरखान तयार झाला होता. संध्याकाळ झाली होती. पण ती मिर्झाराजांसाठी, दिलेरखानासाठी नव्हती. त्याला दिवस व रात्र समानच वाटत होती. त्याला काहीही करून पुरंदरावर हिरवे निशाण हवे होते. स्वत:ला बादशहाची शाबासकी हवी होती व योजनेची पुढील कडी उलगडली. रात्रीच्या प्रहरीच दिलेरखानाने कुबादखान, मित्रसेन, इंद्रमन बुंदेला, राजा रायसिंग, कीरतसिंह, दाऊदखान कुरेशी इ. असे अनेक उच्च कोटीचा पराक्रम गाजवणा-या मोंगली सरदारांना एकत्र बोलावले. काय हेतू होता त्याचा? हेतू एकच, पुरंदरला चारही बाजूंनी वेढा देणे आणि खरोखरच दिलेरच्या आदेशानुसार त्याच्या नामी सरदारांनी दोन हजार सैन्यासह पुरंदरला वेढा दिला. स्वराज्याचा जीव घाबरा झाला. गडावरची मंडळी गडबडली. मात्र भेलकांडली नाहीत. घाबरली नाहीत. येणा-या संकटास तोंड देण्याची त्यांची तयारी सुरू झाली. तलवारी पाजळू लागल्या, दगडांच्या राशी रचल्या जावू लागल्या, भाले, बरचे

इ.आयुधांनी सुसज्ज मराठे लढण्यास तयार झाले. वज्रगडावर व पुरंदरावर असलेल्या सैनिकांनी एकमेकांना मशालीने झुंजण्याची इशारत दिली. खुणेला खुण पटली. आता अखेरपर्यंत झुंजायचे, मरायचे, स्वर्गाला जायचे, परंतू खानाची हौस पुरवूनच, पराभव नकोच. महाराजांना नाहीच आवडायचा. आम्हाला तरी कुठे आवडतो? जगावं तर वाघासारखं लढावं अथवा मरावं हेच ब्रीद आमचं. महाराजांसाठी मरावं पुन्हा जन्म मिळाला तर पुन्हा स्वराज्यातच घ्यावा. पुन्हा महाराजांसाठी जीवन सोपवावं. वा! किती निष्ठा, विश्वासू, भोळी भक्ती महाराजांवर होती त्यांची. कोण होत गडावर? अहो, काळया पत्थरासारखी माणसं. रामोशी, कोळी, हरिजन जातीची. पण जातीला इथे कोण किंमत देतोय? आमची एकच जात मराठयाची. महाराजांसाठी लढणारे, स्वराज्यासाठी बलिदान देणारे मराठे, स्वराज्याच्या आड येणारे सराटे. ते उपटण्यासाठीच मराठयांचं जीवन. जवानांपासून सत्तर वर्षांच्या जख्खड म्हाता–यापर्यंत मराठे दोन्ही गडांवर लढायला तयारी करीत होते. मनात नक्कीच म्हणत होते ‘ये खाना, असा जवळ, या मराठयांचा हिसकाच आम्ही तुला दाखवतो.’आम्ही दिसायला गबाळं, रानगट, वेंधळं दिसत असलो तरी तुला रोखण्याचं

सामर्थ्य आमच्या रगारगात सामावलेलं आहे बरं का! यांना दोन प्रेरणांनी सतत लढण्यास उदयुक्त केले होते. एक प्रेरणा म्हणजे शिवाजी महाराज व दुसरी प्रेरणा म्हणजे खुद्द या किल्ल्याचा प्राण! कोण होता तो? मजबूत बांध्याचा, नव्या उमेदीचा, निष्ठावान, पराक्रमी शिवाचा अवतारच जणू असा मुरारबाजी देशपांडे! कोण हा मुरारबाजी? जावळीचे प्रकरण जर आठवले तर नक्कीच आठवेल, या प्रकरणातच महाराजांना जावळीबरोबर प्रतापगड प्राप्त झाला पण त्याबरोबरच आणखी एक रत्न मिळाले. ते म्हणजे मुरारबाजी देशपांडे. शिवाजी महाराजांनी या रत्नाला आपल्याकडे वळवले. त्यानेही स्वतःला महाराजांच्या सेवेत झोकून दिले. महाराजांच्या रत्नागरांत आणखी एक रत्न चमकू लागले. थोडयाच काळात या रत्नाने अनेक पराक्रम केले. त्या पराक्रमाच्या जोरावरच महाराजांनी मुरारबाजींना पुरंदरची जबाबदारी दिली व त्यानेही महाराजांचा विश्वास सार्थ ठेवत गड राबता ठेवला. गडाबरोबरच आजुबाजूच्या परिसरावरही घट्ट पकड निर्माण केली, तंटे-बखेडे सोडवले, माणसं जोडली, शिस्तबद्धता निर्माण केली. चिव्हेवाडीसारख्या गावात व्यायामासाठी तालमीचा घाट त्याने घातला. मुरारबाजी तसे कडकच अन्याय, अत्याचार करणा-याला त्यांच्याकडून

सुटका नसेच. न्यायप्रविष्ठ, कर्तव्यपरायण, शूर, बलशाली महाराजांचा आवडता शिलेदार मुरारबाजी! हो, त्यांच्यासारखे तेच!

मुरारबाजींना आता चिंतेने ग्रासले होते. त्यांच्या डोळयांसमोर सतत दिलेरखानाचा उग्र चेहराच जाणवत होता. जरी ते दिलेरखानाला कधीही भेटले नसले तरी धर्मांध, स्वराज्याचे शत्रू त्यांना एकाच चेह-याचे जाणवत असत. तो दिलेरखान व त्याची ती हिरवी फौज पुरंदर व वज्रगडांचे गळे आवळायला निघाले होते. आजुबाजूने होणारे तोफांचे मारे, बंदुकीच्या गोळयांचा आवाज काळजात भीती दाखवत होते. क्षणभर भिती वाटे मात्र नंतर आपोआपच लढण्याची उर्मी निर्माण करत होते.

दिलेरखानाच्या पुढील योजनेनुसार त्याने पुरंदराला परास्त करण्यासाठी अगोदर वज्रगडावर आक्रमण लावलेले होते. कारण वज्रगड ताब्यात आला की पुरंदराला गिळणे अधिक सोपे एवढी अक्कल दिलेरखानाला अल्लाने दिली होती. वज्रगड अथवा रूद्रमाळ व पुरंदर यांच्यात 'भैरवखिंडच' मध्ये होती. अन्यथा दोन्ही एकाच मातृभूमीची तरणीबांड लेकरं होती. पुरंदर वयाने ही मोठा व उंचीनेही

वज्रगडापेक्षा थोडासा उंच. केवढा? वज्रगड पुरंदरच्या खांदयाला लागेल एवढा उंच होता. वज्रगडावर होणारा तोफगोळयांचा वर्षाव पाहून किल्ल्यावरील लोकांना थोडीशी धास्ती निर्माण झाली होती. दिवस-रात्र वज्रगडाचा पाडाव करण्यासाठी दिलेरखान आग ओकीत होता. गडावर ३00 रोख मावळे होते. मावळे कसले, श्रीराम प्रभूंची वानरसैनाच! वानरसेनेने जसं राक्षसांना व रावणाला ही सळो की पळो केले तसेच ही शिवरायांची वानरसेना दिलेरखानाच्या आक्रमणाला तोंड देण्यास सक्षम होती. मधून-मधून गडावरून उतरून काही टोळकी दिलेरखानाच्या सैन्यावर हल्ला करीत होती. चार-पाच गनीम मारून ते पुन्हा पळून जात होते. दिलेरखानापर्यंत या खबरी पोहचत होत्या. खान आगबूंद होत होता. आक्रमण कठोर व्हावे म्हणून फौजेस अर्ध्या गडापर्यंत चढून निकराने लढण्यास सांगितले. दिलेरखानाची फौज निकराने लढत होती. परंतु मराठी मावळयाच्या त्वेषापुढे काही वेळा माघारही घ्यावी लागत होती.

पहिली रात्र अशीच उलटून गेली. पुरंदरावर असलेल्या मुरारबाजींच्या डोळयाला डोळा नव्हता. त्याला चिंता सतावत होती. ती म्हणजे वज्रगड, कारण वज्रगड पडला, की पुरंदराला नख लागलचं म्हणून समजा.

पुरंदरावरून पहाण्यापलीकडे ते काहीच करू शकत नव्हते. कारण दोन्ही गड मोगलांनी वेढले होते. ३०० विरूद्ध हजारो अशी विषम लढाई लढली जात होती. एका बाजूला दिलेरखानाचा द्वेष, क्रूरता, क्रोध, चीड होती. तर मराठयांत महाराजांविषयी निष्ठा, प्रेम होते. द्वेष विरूद्ध प्रेम लढत होते. कोण जिंकणार हा प्रश्न होता. इकडे महाराज प्रतापगडावर भवानी मंदिरात दर्शन घेऊन पुन्हा राजगडावर पोहचले होते. राजगडावर आल्यानंतर महाराजांनी बहिर्जींना बोलावून घेतले. बहिर्जी व भिकाजी दोघेही महाराजांसमवेत खलबतखान्यात विसावले होते. महाराजांनी बहिर्जी व भिकाजीला पुरंदरावर विशेष लक्ष ठेवण्यास सांगितले होते. दोघेही मुजरा करून महाराजांच्या आज्ञेनूसार पुरंदरावर लक्ष केंद्रीत करण्यास निघाले. पुरंदर व परिसरावर भिकाजी लक्ष ठेवणार होता व त्याची खडान्खडा माहिती तो बहिर्जींना देणार होता व ती नंतर बहिर्जींमार्फत महाराजांपर्यंत पोहचवली जाणार होती.

सकाळची वेळ होती. चारही बाजूंनी सूर्याची पिवळी किरणे पसरली होती. वज्रगडावर अविश्रांत खानाची फौज आक्रमण करतच होती. इकडे चिव्हेवाडीच्या सकाळच्या प्रहरी सुंदर पाव्याचा व मंजुळ स्वरांचा अभिषेक करत एक

वासुदेव आला होता. दान मागत होता स्वराज्याचं, स्वातंत्र्याचं शिवरायाला उदंड आयुष्य मिळावं म्हणून. गावभर फिरून हा वासुदेव एका घराच्यासमोर आला. भिकाजीच्या घरासमोर गीत गाऊ लागला. भिकाजीची बायको 'पमा' बाहेर आली व नमस्कार करून तिनं सुपातलं जोंधळं त्याच्या झोळीत टाकलं. पुन्हा ती घरात जायला निघणार तेव्हा त्यानं तिला दबक्या आवाजात हाक दिली. मागे वळून पाहते तो वासुदेवचा पोशाख उतरवून भिकाजीच तिच्या समोर उभा होता. चटकन तिने घराचा दरवाजा बंद करून घेतला. कारण एक दिवसापूर्वीच खानाच्या फौजांनी चिव्हेवाडीत धुमाकूळ घालून घरांतल्या अनेक पुरूषांना पकडून नेले होते. तसेच शिवाजीचा माणूस सापडला तर तो त्यांच्या तलवारीखाली आल्याशिवाय राहिला नव्हता. तिचं कुंकू बळकट होतं. खानाच्या त्या हेरांच्या गराडयातून तो वाचून घरापर्यंत पोहचला होता. पण वेशांतर करून आता तो आराम करण्यासाठी घरी आला नव्हता. तर महाराजांच्या विशेष मोहिमेनिमित्त, त्यांचा एक गुप्तहेर म्हणून आला होता. त्याला इथं येऊन विविध रूपं धारण करून पुरंदर व वज्रगडाच्या परिसराच्या खबरा बहिर्जींना दयायच्या होत्या. पमाला आज आपल्या नव-याचा किती अभिमान वाटत होता

म्हणून सांगू? तिला आनंदाचं भरतं आलं होतं. ती स्वत: आपल्या नव-याला या कामात  मदत करायला तयार झाली, कारण नवरा जर स्वराज्यासाठी मरायला तयार झाला, तर आपण मागे राहून कसं चालेल जिथं शिव तिथं पार्वती. जिथं राम तिथं सीतामाता मग कुंकू ज्याच्या नावानं लावायचं त्याला साथ दिलीच पाहिजे. शहाजी राजांना नाही का जिजाऊ आई साहेबांनी मदत केली. आपण पण नव-याला एकटं सोडून नाही चालायचं असं ठरवून तिही कर्तव्यास तत्पर उभी झाली. भिकाजीही थोडा सुखावला. त्याची कामगिरी आणखी मजबूत झाली होती. भिकाजीने हेराच्या काही जबाबदा-या कर्तव्ये व कोणत्या बाबतीत काळजी घ्यावी याविषयी सूचना केल्या.

संध्याकाळ उलटून गेली होती. भिकाजी जेवणखान घेऊन तयार झाला होता. आणलेल्या झोळीतून फकिराची कफनी व केशसंभार काढला छान असा फकिराचा वेश धारण केला. हातात कटोरा घेतला व दाढी लावून संध्याकाळच्या शांत वातावरणातच घराबाहेर पडला. चिव्हेवाडीतून नारायणपेठेपर्यंत आला. वाटेनं येतांना 'अल्लाहू अकबर'चा घोष चालूच होता. कारण होते रूप खरे वाटावे म्हणून आजुबाजूला खानाचे व मिर्झाराजांचे गुप्तहेर जवळपास सतत

भटकत होते. त्यांच्या गुप्त नजरा सतत काहीतरी न्याहाळत होत्या. त्या तीक्ष्ण व न्याहाळणा-या नजरांतून वाचण्यासाठीच त्याची ही युक्ती होती. नारायणपेठेपर्यंत मिर्झाराजांची व दिलेरखानाची फौज पसरलेलीच होती. अनेक राजपूत, बहलिए, पठाण, तर काही मराठा सरदारही खानाच्या फौजेत होते. खानाची ती हजारोंची फौज अजगरासारखी रानोमाळ पसरली होती. कोणाचा, कोणाला, काहीही पत्ता नव्हता. अशातच फकीर म्हणजे अल्लाचा बंदा त्याला कोण रोखणार? त्याला कुठेही मुक्त प्रवेश. भिकाजी फकिर बनून फौजेतून फिरत होता फौजेतील काही सरदार मस्तवाल होते. खाणे-पिणे मजबूत होते. रात्रीचा अवधी होता. मोंगली गोटांतून शिजणा-या अन्नाच्या सुगंधाप्रमाणे खानाच्या गोटांतील सरदारांच्या मुखांतून अनेक खबरा बाहेर पडत होत्या. अनेक योजनांची गुपितं बाहेर पडत होती. ती सगळी गुपितं, खबरा कानांची ओंजळ करून भिकाजी हृदयात साठवून ठेवत होता. अशा दोन दिवस व दोन रात्री त्याने नकळत कुणालाही समजू न देता खानाच्या गोटात, फौजेत राहिला व अनेक खबरा व दिलेरखानाचे मनसुबे ऐकून घरी परतला. पमा त्याची वाट पाहतच होती. तिनेही दोन दिवसात आजुबाजूला फिरून काही महत्वाच्या बातम्या गोळा केल्या होत्याच.

हा सर्व खजिना घेऊन गुप्तपणे फकिराच्याच वेशात तो राजगडाच्या पायथ्याशी असलेल्या महत्त्वाच्या ठिकाणाशी पोहचला. तिथे बहिर्जी नाईकांशी त्याची भेट झाली. भिकाजीने मनात दडवून आणलेल्या अनेक खबरा, गुपितं बर्हि जींपर्यंत पोहचवली. आता भेट शिवाजीराजांची. भिकाजी, बर्हिजी व काही मंडळी गोंधळयांच्या वेशात राजगडावर पोहचली. महाराजांना खबर पोहचली. खलबतखान्यात महाराज लगोलग पोहचले. महाराज, बहिर्जी व भिकाजी यांच्या व्यतिरिक्त तेथे कोणीच नव्हते. एवढी गुप्तता तिथे निश्चित राखली जात होती. पुणे, चाकण, सुपे, शिरवळ व आजुबाजूच्या प्रदेशावर मोंगली सैन्याच्या वाढलेल्या अत्याचाराची खबर बर्हिजींनी सुनावली तर पुरंदर व वज्रगडाच्या परिसरातल्या खबरा भिकाजीने सुनावल्या. महाराजांनी दोघांच्याही खबरा ऐकून घेऊन पाठवून दिले. महाराजांची चिंता आणखीनच वाढली होती. वज्रगडावरील ३00 मंडळींची चिंता त्यांना सतत सतावत होती. ही मंडळी इरेला पेटून लढा देत होती पण किती दिवस? महाराजांच्या मनात अनेक विचार घोळत होते. बाहेरून काही मदत करता आली तर, पण सध्यातरी खानाचा पहारा कडक होता. चारी बाजूंनी चौफेर कडक वेढा होता.

त्याच्यातून वज्रगडावर व पुरंदरावर मदत व रसद पोहचवायची म्हणजे चमत्कारच . पण लवकरच हा चमत्कार घडविला पाहिजे अशी महाराजांची इच्छा व मनोकामना होती. महाराजांची पुढील योजना आखण्याची तयारी चालू होती. आता प्रतिक्षा होती बहिर्जींच्या पुढील महत्त्वाच्या खबरींची. बहिर्जी व भिकाजी जीवाच्या आकांताने घोडदौड करत होते. वेळोवेळी वेगवेगळी सोंगं वठवून, वेशांतर करून, महत्त्वाच्या खबरा, गुपितं गोळा करतच होते.

वज्रगडाची तब्बेत नाजूक बनत चालली होती. त्याने तरी किती सहन करावे. सतत उत्तरेकडून दिलेरखानाच्या सैन्याचे प्रखर आक्रमण होतच होते. पुरंदरच्या माचीवरही तेवढयाच त्वेषाने आक्रमण होतच होते. आता लढाई शेवटचीच . असा धडाका लावला होता. वज्रगडावर दिलेरखानाने 'एल्गार' मांडला होता. बहलिए, पठाण, राजपुत, बुंदेले यांचा धडाका वज्रगड किती सहन करेल. हाच सवाल होता. आतिशखान नावाप्रमाणेच तोफखान्याची आतिशबाजी करत होता. खुद्द मिर्झाराजेही मोर्च्यावर उभे होते. मधेच बहलिए, पठाण, राजपुत, बुंदेले वज्रगडावर चढाईचा घाट घालत होते. चोर पावलाने वर सरकत होते.

हे पाहताच वरूनही तितक्याच निकराने बंदुकीच्या फैरी झडत होत्या. दगडधोंडे गडगडत येत होते. अनेक मोंगलांच्या मस्तकाचा वेध घेतच ते पायथ्याशी येत होते. वज्रगडावरून त्यांचे गडकरी व पुरंदरावरून मुरारबाजी रात्रंदिवस प्रखर विरोध करत होते. सलग आठ दिवस झालेल्या आक्रमणाचा धूमधडाका वज्रगड सहन करत होता. दिलेरखान हट्टाला पेटला होता. फक्त ३०० मावळयांवर आपण मात करू शकत नाही असा विचार येताच दिलेरखानाची आग मस्तकाला जात होती.

आता त्याची तयारी चालली होती. माणसांच्या फौजेबरोबरच तोफांची फौज ही वज्रगडाच्या छातीपर्यंत १२०० फुट चढवली तर? वज्रगडच काय पुरंदरही दणाणून सोडता येईल अचूक संधान झाल्यास नक्कीच दोन्ही किल्ले गुडघे टेकतील. किती मोठी योजना किती भयंकर चाल होती दिलेरखानाची! योजना ठरली व अंमलबजावणी सुरू झाली. मोंगलाकडे छोटया लोकांसमवेत विशेष चमूतल्या महत्वाच्या तीन तोफा होत्या. एक अबदुल्लाखान, दुसरी फत्तेलष्कर तर तिसरी महेली. दिलेरखानाने आतिशखानाला तिनही तोफा कोणत्याही स्थितीत वज्रगडाच्या मध्यापर्यंत चढवण्याचा आदेश दिला.

मिर्झाराजांना ही गोष्ट अशक्य वाटत होती. पण दिलेरखानाच्या हट्टापुढे त्यांना काहीच बोलता येत नव्हते. माणसांच्या सहाय्याने अपरिमीत कष्ट घेऊन तीनही तोफा वज्रगडाच्या मध्यापर्यंत पोहचल्या. या बातमीने दिलेरखानाला स्वर्ग दोन बोटेच उरला. आता वज्रगड व पुरंदर आपल्या हातून सुटणे शक्यच नाही अशी खात्री निर्माण झाली. रात्रंदिन तोफांचा भडिमार सुरू झाला. तोफगोळयांची बरसात वज्रगडाबरोबरच पुरंदरावरही होऊ लागली. भिकाजी व त्याचे सहकारी परिसराच्या आजुबाजूला मोंगली सैनिकांच्या वेषात, कधी मौलवी, कधी फकीर, कधी चांभार इ. वेषात फिरत होते. वज्रगडावर होणा-या हल्ल्यांच्या तंतोतंत खबरी महाराजांपर्यंत पोहचवण्याचे काम अविश्रांत चालू होते. बर्हि जी शिवाजी राजांपर्यंत त्या बातम्या पोहचवत होते. महाराजांची चलबिचल होत होती. प्रसंग फार बाका होता. महाराजांच्या सल्लागारांनी महाराजांना अनेक सल्ले दिले होते. काहींनी तह करण्यास सांगितले . कोणी सरळ मोंगलांवर आक्रमण करण्यास सांगितले. पण महाराज मात्र योग्य समयाची वाट पाहत होते. मोंगलांच्या लाखोंच्या फौजेवर आक्रमण करणे अशक्य. डाव उधळला जाईल व स्वराज्याचा विध्वंस होईल. नको ते दिव्य! विचारमंथन

||शत्रुशी लढताना भिकाजी||



चालूच होते.

पुरंदरावर मुरारबाजी संतापून उठले होते. त्यांनी आपल्या भोळयाभाबडया सहका-यांना चिथावणी खोर भाषणांनी चेतवले होतेच. सहकारीही मरायची व मारायची भाषा बोलत होते. आता निर्वाणीची लढाई मागे हटणे नाहीच काय होईल ते पुरंदरावरच. त्या शिवाय महाराजांना तोंड नाही दाखवायचे अशा आणा-भाका खाल्ल्या जात होत्या. मुरारबाजींची नजर खिळली होती वज्रगडावर. मनोमन गडावर मदत पोहचवावी वाटत होती. परंतु चारही बाजुंनी असलेल्या वेढयाने ते अशक्य होते. काय करावे उमगत नव्हते. हातावर हात धरून बसावे लागत होते. असा प्रसंग पाहण्यापेक्षा मरण बरे! अशी त्याची धारणा झाली होती. सतत ११ दिवस आक्रमणानंतर १२व्या दिवशी मोंगली फौज तोफांच्या आक्रमणाच्या मदतीने गुप्तपणे वज्रगडावर चढली. दरवाजापर्यंत मजल मारली. आता धोक्याची सुचना होती. किल्लेदारांसाठी व मावळयांसाठी आता मरणे व मारणे हाच पर्याय त्यांना उपलब्ध झाला. गडावर तीनशे मावळे व शत्रूची फौज हजारोंची सामना कसा व्हायचा .

पण एक - एक मावळा दहा हशमांना भारी पडेल असा होता. दरवाजावर झाला होता. हरलो तरी मान ताठच राहील. मरू पण शिवरायांसाठीच या हिंमतीने सर्वजण उभे होते. त्यांचा तो तोरा पाहूनच मिर्झाराजांनी त्यांना सोडून दिले. दुसरा उद्देश होता पुरंदरावरच्या किल्लेदारांसह इतर मावळयांनी शरण यासाठीच ती तगमग परंतू झालं उलटचं. वज्रगडावर हिरवे निशाण फडकलेले पाहून पुरंदराचे माथेच फणाणले. 'आता दिलेरखानाची ऐशी की तैशी. सोडत नाही एकाही मोंगलाला असा चित्कार मुरारबाजींनी व मराठयांनी केला'.

मराठे निराशेने ग्रासलेल्या अवस्थेत, माना खाली घालून मोंगली छावणीतून राजगडाकडे चालू लागले. वज्रगड पडल्यापासून ते आजपर्यंत भिकाजी व त्याचे दोन सहकारी फकिराच्या व सैनिकाच्या वेषात मोंगलाच्या गोटातच होते. मराठयांच्या जीवाची ही घालमेल उलाघाल त्याने जवळून पाहिली होती.पण मराठयांचा स्वाभिमानही त्याला खुणावत होता. मिर्झाराजाला, दिलेरखानाला जवळून पाहण्याचा मौका पहिल्यांदाच भिकाजीला मिळाला होता. मिर्झाराजांचा दिलदारपणा व दिलेरखानाचा हटवादी व उद्दाम स्वभाव त्याने जवळून न्याहाळला. तिथेच पुरंदरावर पुढची चढाई करण्याचा

मिर्झाराजांचा मनसुबा त्याला समजला. या विचारानेच तो थोडासा भांबावला. संपूर्ण खबरा मिळवून त्याने सखाराम नावाच्या आपल्या सहका-यामार्फत या सर्व खबरा बर्हिजींकडे पोहचवण्याची जबाबदारी सोपवली व तो पुन्हा पुरंदराच्या शिवारात व मोंगलांच्या गोटात इकडे-तिकडे फिरून बातम्या, गुपितं जमा करीत होता जीवावर उदार होऊन. कारण कधी शत्रूपुढे भांडे फुटेल याची शाश्वती नव्हती. पण जे शूर असतात ते मरणाची फिकीर करीत नाहीत. महाराजांकडे येण्यापूर्वीच त्याने भितीचा कडेलोट केला होता.

वज्रगड लढून-लढून पडला. आता पाळी पुरंदराची. वज्रगडावरून सरळमार्गाने तोफांचा भडिमार चालला होता. तर पुरंदराच्या पायथ्यापासूनही वरच्या दिशेने तोफा आग ओकीत होत्या. समोरून मिर्झाराजे स्वत: दिलेरखान, मिर्झाराजांचा मुलगा कुवरसिंह, राजा रायसिंग, उदयभान, हरिभान गोंड, तोफखाना सांभाळणारा आतिशखान, मीर आतिश, करण राठोड, चर्तुभूज चौहाण अशी पराक्रमी मंडळी स्वत:ची ताकद व अनुभव पणाला लावून लढत होती. ईशान्येकडून कंदकडयावरही तुफानी भडीमार चालला होताच. तसेच किल्ल्याच्या पाठीमागे म्हणजे दक्षिणेकडून दाऊदखान कुरेशीकडे संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली.

त्याच्या हाताखाली राजा रायसिंह राठोड, मुहम्मद हुसेन दाऊदझई, आबिदीन बुखारी, झैनुल, शेरसिंह राठोड, राजसिंह राठोड अशी तलवार गाजवणारी मंडळी होती. पुरंदर चारही बाजूंनी वेढला होता. वरील लोकांना चारही बाजूंनी होणा-या आक्रमणास तोंड दयावे लागत होते. क्षणाचीही उसंत त्यांना मिळत नव्हती. आता उसंत मिळेल ती मरणानंतरच. मुरारबाजी त्वेषाने लढत होता. गडावरची गडकरी मंडळी त्यात हरिजन होते, कोळी होते, रामोशी होते, मराठे नेटाने लढत होते. तोडीस तोड पराक्रमाचा सामना मोंगली सेनेला करावा लागत होता. गडावर होते ५००० लोक दाणा-पाणी पुरंदरावर होते मात्र सध्या लढता-लढता १५ दिवस होऊन गेले होते. पुरंदरवरचा दारूगोळा संपण्याच्या मार्गावर होता. बाहेरून महाराजांकडून रसद मिळावी अशी मुरारबाजींची अपेक्षा होती. का कुणास ठाऊक पण मुरारबाजींची ही अपेक्षा शिवाजी महाराजांनी जाणली. मुरारबाजीसारख्या भक्ताने मदतीची हाक मारली व ती शिवदेवांच्या हृदयापर्यंत पोहचली, लागलीच महाराजांनी भिकाजीला तत्परतेने बोलावून घेतले घाईगडबडीतच भिकाजी आपल्या सहका-यांना कामं वाटून देऊन राजगडाकडे दौडला. पहाटेच्या सुमारास तो राजगडावर आला.

महाराजांबरोबर बहिर्जी, तान्हाजी, येसाजी होतेच. गुप्त खलबत सुरू झाले. भिकाजीलाही मुरारबाजींची अडचण जाणवली होतीच. महाराजांचाही विचार पुरंदरावर बाहेरून काही मदत पुरवण्याचा होता. सर्वांचे एकमत झाले हे काम कोणाला दयावे या बाबतीत विचार सुरू झाला. कारण नेताजी परिंडयावर थांबून हल्ले करत होते. राजगड, पुणे, कोकण तसेच बारा मावळात होणा-या आक्रमणाला रोखण्यासाठी तान्हाजी, येसाजी, कुडतोजी गुजरासारख्या कर्तबगार सेनानींची गरज होती. मग पुरंदरावर कोणाला धाडायचे? हा प्रश्न सतावत होता. अचानक बहिर्जींनी भिकाजीकडे निर्देश केला. महाराजांच्या चेह-यावर हास्यरेषा उमटली. त्यांना अंधारात प्रकाशाची लकेर उमटतांना दिसली. झाले ठरले एकदाचे. भिकाजीवर ही कामगिरी सोपवण्यात आली. कामगिरी तेवढी सोपी नव्हती. फार जोखमीची व कठीण होती. कानोकान खबर न होता ही रसद पुरंदरावर पोहचवायची होती. साक्षात लंकिणीच्या पहा-यापासून वाचत जावून सीता-मातेपर्यंत पोहचण्यासारखीच ही करामत होती. पण भिकाजीने ही करामत करून दाखवण्याचा विडा उचलला महाराज निहायत खुश झाले. बहिर्जींना आपल्या सहका-यावर किती विश्वास होता हेच यातून सार्थ झाले.

महाराजांनी भिकाजीला आलिंगन दिले. निरोपाचे विडे दिले. तसेच एक खमकी, तेजतर्रार तलवार त्याच्या कमरेस बांधली. महाराजांना लवून मुजरा करत सुखी मनाने चिव्हेवाडीकडे दौडला. चपळाईने तो चिव्हेवाडीकडे आला कारण दुस-या दिवशी अमावस्या होती. उदयाच महाराजांचे काम तडीस न्यावयाचा त्याचा मानस होता. त्याअगोदर आपली छोटी फौज तयार करणे गरजेचे वाटले म्हणून तो चिव्हेवाडीकडे आला. रात्रीच्या सुमारास चालतच गावशिवेवरून, गुप्तपणे, वेशांतर करून गावात आला व घरात घुसला. पमा आनंदाने न्हाऊन निघाली . कारण पतीचे दर्शन तिला अनेक दिवसांनी होत होते. पुरंदराच्या शिवारातच हे गांव होते मात्र महाराजांच्या कामापुढे व निष्ठेपुढे भिकाजी अनेक दिवस गावाकडे व घराकडेही आला नव्हता. पमाचीही काही तक्रार नव्हती कारण तिलाही स्वराज्याचा अभिमानच वाटत होता. तसाच नव-याचाही होताच. त्यामुळे आपल्या स्वार्थी संसारापेक्षा तिला स्वराज्याचा संसार नीट थाटला जावा असचं वाटत होतं. किती मोठं मन होत तिचं! स्वराज्य निर्माण करण्यास मावळयांबरोबर तेवढीच मदत त्यांच्या कारभारणींचीही होती. कारण कारभारी महीनो न् महीने घराबाहेर राहत तेव्हा घराची जबाबदारी ती सक्षमपणे निभावत

होती. म्हणूनच मराठे निर्धास्तपणे मोहिमांवर जात होते. धन्य त्या मातांची, भगिनींची!

सकाळच्या प्रहरीच भिकाजीने आपल्या सहका-यांना एकत्र केले. महाराजांची कामगिरी नीट समजावून सांगितली. शेलके ६० मावळे त्याने निवडले व तो पुन्हा शिरवळच्या घाटाकडे आला. तिथे बर्हिजी व मावळे होतेच. बर्हिजींनी भिकाजीला व त्याच्या सहका-यांना उद्देशून काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. भिकाजी व त्याच्या मित्रांनी ती दारूगोळयाची पोती, शस्त्र सामुग्री इ. रसद घोडयावर लादली व ते क-हेपठाराच्या दिशेने निघाले. पुरंदरापासून तीन कोसांवर एका दरीत हे सर्व मित्र जमले. योजना आखली जाऊ लागली. पुरंदरच्या समोरच्या बाजूने आपण किल्ल्यावर चढू शकत नाही. वज्रगडाकडून तसेच कंदकडयाकडूनही वर चढणे अशक्यच मग पर्याय एकच पुरंदरच्या पाठीमागून क-हेपठाराकडूनच किल्ला वर चढून जाणे थोडेसे सोईस्कर वाटले. योजना सांगितली गेली. निर्णय पक्का झाला. धोका ओळखला गेला. कारण या बाजूला दक्षिणेला दाऊदखानाचे मोर्चे होते. अपरिमीत असे सैन्य होते. रात्रंदिवस कडक पहारे बसवलेले होते. चिटपाखरू अथवा सावजालाही जायला

येथून वाट नव्हती. मग आपण जायचे कसे? कसे? लंकेत जसा हनुमान गेला तसेच गेले पाहिजे कारण शब्द दिलाय राजांना. आता माघार नाही. आता मोहीम किल्लेपुरंदर!

संध्याकाळ झाली होती. कडूसं पडू लागलं होतं. भिकाजी सहका–यांसह बांदलवाडीच्या जवळ आला. डोक्यावर मोठमोठी ओझी होती. बांदलवाडीत त्यांचा प्रवेश झाला. सामसूम होती. परंतु जवळच दाऊदखानाचे मोर्चे होते. तेथून तोफांचे आवाज ऐकू येत होते. तसेच प्रकाशही दिसत होता. बांदलवाडीत आल्यावर बाकीची मंडळी धर्म शाळेत गडप झाली. मात्र भिकाजी वेषांतर करून गावच्या पाटलाकडे गेला. बांदल–देशमुख हे गावचे पाटील होते. वाडयात येताच भिकाजीने पाटलांना आपण शिवाजी महाराजांचे सैनिक असल्याची खूण पटवून दिली. पाटीलही महाराजांचे निष्ठावंत सेवक होतेच. भिकाजीने पाटलांना आपल्या योजनेची खबर दिली. पाटलांना कार्यक्रमाची रूपरेषा समजली. भिकाजीने पाटलांना मदतीची याचना केली. पाटलांनीही होकार दिला. पुरंदरावर जाण्यासाठी समोरच जी ‘काळदरी’ आहे त्या मार्गाने ठामपणे किल्ल्यावर चढता येईल असा विश्वास पाटलांनी भिकाजीला दाखवला.

या बाजूला शत्रूची फौज व गस्तही कमी असल्याचे पाटलांनी भिकाजीला सांगितले. भिकाजी पाटलांचा मुजरा स्विकारत धर्मशाळेकडे आला. निघण्याची तयारी झाली. भिकाजी पुढे निघाला होता. त्या मागोमाग ही साठ जणांची फौज निघाली होती. काहीही न विचारता आपल्या म्होरक्या पाठोपाठ कोणत्याही परिस्थितीत गडावर पोहोचायचेच हा निर्धार!

रात्रीचा काळोख मी म्हणत होता. सर्वजण 'काळदरीत' उतरले होते. सगळीकडे काळाकुट्ट अंधार पसरला होता. येथूनच अंदाज घेत वर किल्ल्यावर चढायचे होते. नुसता किल्ला वर चढून जायचे होते? नाही! दाऊदखानाच्या तीक्ष्ण डोळयात धूळ फेकून तसेच दाऊदखानाच्या फौजेतील गुप्तहेरांना सुगावा लागू न देता, बंदुकीच्या फैरींना चुकवून वर चढणे म्हणजे स्वर्गारोहण करण्याएवढे कठीण काम होते. याच बाजूला गडाचा 'केदार' दरवाजा होता. मोंगल या दरवाजाला 'खिडकी' म्हणत. महत्वाच्या दरवाजांपैकी हाही दरवाजा होता. केदारेश्वराचे स्मरण झाले. महाराजांना मुजरा करून ही मंडळी काळदरीतनं कडा चढू लागली. मोकळया हातानं नाही, मनभराचं ओझं डोक्यावर घेऊन ही मंडळी वर चढत होती. मार्ग सोपा होता? नाही, फार खडतर होता. किल्ल्याच्या

या भागावर रान खुपच वाढलं होतं. काही मोठी झाडं होती. मध्येच काही खुरटया वनस्पती होत्या. काही ठिकाणी करवंद, कान्हेरी इ. सारखी झुडपं वाढलेली होती. दगड-धोंडे सरकण्याची भीती होती. कारण दगड-धोंडे सरकले व त्याचा प्रतिध्वनी उमटला व दाऊदखानास त्याचा पत्ता लागला तर सारा खेळ 'काळदरीतच' संपणार होता. सावधपणे ही मंडळी वर चढत होती. काही ठिकाणी काटेरी झुडपे, भितीदायक घळी, भोकं दिसून येत होती. साप - विंचवाची ती घरेच, त्यांना मागे सारून ते पुढे जात होते. जे मरणाला घाबरत नव्हते ते साप - विंचवाची तमा काय बाळगणार होते. शत्रूची गस्त काटेकोर होती. त्यांना चुकवून ते वर जात होते. सावकाश, एकमेकांना सावरत, धीर देत वर चढत होते. शत्रूला जर पत्ता लागला तर मात्र 'काळदरीत' त्यांची गाठ साक्षात काळाशीच पडणार होती. पडत-धडपडत, सरकत, सरपटत ही मंडळी केदार दरवाज्याजवळ पोहोचली. अविश्रांत परिश्रम साध्य झाले. फळास आले. आशेला पालवी फुटली. केदार दरवाज्याजवळ पोहचताच भिकाजी व सहका-यांना स्वर्गाचा दरवाजा गाठल्यासारखेच वाटले.

भिकाजी व सहका-यांनी एकमेकांकडे पाहिले. काय त्यांचा आनंद वर्णावा म्हणून सांगू! साक्षात लंका जिंकल्याचाच

त्यांना आनंद झाला. दोन दिवस घेतलेल्या अथक परिश्रमाचे सार्थक झाले. केदार दरवाजा ठोठावला गेला. छोटया खिडकीतून बाहेरच्या माणसांचा अंदाज घेतला गेला. आपल्या माणसांना आतील माणसांनी ओळखले. हृदयीची खूण पटली. चटकन दरवाजा उघडला गेला. भिकाजी व सहका-यांना किल्ल्यात प्रवेश मिळाला. समोर मुरारबाजी उभे होते. त्याने भिकाजी व सहका-यांना पाहिले. त्यांनी आणलेल्या युद्ध साहित्याची खबर त्यांना अगोदरच मिळाली होती. त्यांना झालेला आनंद अवर्णनीय होता. त्यांनी धावतच जाऊन भिकाजीला घट्ट मिठी मारली. दोघांच्याही डोळयांत आसवं तरारली. रसद आणल्याबद्दल मुरारबाजी भिकाजीला धन्यवाद देत होते. गडावर होळी, पाडव्यासारखा आनंद पसरला होता. परंतू हा आनंद साजरा करायला जास्त वेळ नव्हता. शत्रू करडी नजर रोखून पुरंदराकडे बघत होता. पुरंदराचा गळा आवळायला फास टाकला जात होता. महाराजांनी अनेक सूचना भिकाजीकडे दिल्या होत्या. तत्परतेने भिकाजी व मुरारबाजी खलबतखान्यात गेले. भिकाजीने महाराजांनी दिलेल्या सूचना मुरारबाजींना दिल्या. कसेही करून महाराजांचा पुढचा निरोप येईपर्यंत गड लढता ठेवण्याचा संदेश मुरारबाजींना मिळाला.

नाही, आता माघार नाही. महाराजांचा आदेश म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचाच आदेश! आता निर्वाणीचे लढणेच साधले पाहिजे. या विचारांनीच प्रेरित होऊन दोघेही बाहेर आले. गडावरील महत्त्वाच्या सहका–यांना जवळ बोलावले गेले. मुरारबाजींनी त्वेषाने बोलून आपली मनीची कळकळ व महाराजांचा आदेश ऐकवला. प्रत्येक जण कानात प्राण आणून ऐकत होता. मुरारबाजींच्या मुखाने महाराजच बोलत होते. मुरारबाजींची वाणी तेजस्वी होती, डोळयांत राग, अंगार होता. 'मरावे परी गड शत्रूपदी न लागावा' अशी धारणा होती. सगळे मावळे रागाने फणफणले होते. शौर्य उफाळून आले होते. भिकाजी व त्याचे सहकारी मुरारबाजींना मिळाल्याने गडावरच्या प्रत्येकाचा उत्साह द्विगुणीत झाला होता. भिकाजी म्हणजे दुसरे बहिर्जी नाईकच. चातुर्य व पराक्रम यांचा मेळ म्हणजे भिकाजी होता. त्यामुळे मुरारबाजी व भिकाजी असं समीकरण झाले व त्यामुळे गडावर जीव व शिवाचेच एकत्रीकरण झाल्याचाच आभास निर्माण झाला होता. नवीन योजना, आडाखे बांधायला सुरूवात झाली होती. युद्धनितीत कोणते परिवर्तन करायचे याचा मोलाचा संदेश भिकाजीने मुरारबाजींना दिला. त्यानुसार योजना आखली जात होती. मोंगलांना गनिमी काव्याबरोबर तुकडी–

तुकडीनेही मध्येच सामोरे जाऊन त्यांच्या बळाचे व आत्मविश्वासाचे खच्चीकरण केले पाहिजे असे ठरवले गेले. तुकडया तयार होत होत्या. मुरारबाजी व भिकाजी सखोल मार्ग दर्शन करत होते.

ही झाली गडावरची लढाईची तयारी व धामधूम गडावर आनंदाचे तोफगोळे फुटत होते. पराक्रम चहासारखा उफाळून आला होता. गडाखालीही असेच तोफगोळे फुटत होते. त्यातलाच एक गोळा फुटला! तो दिलेरखानावरच! काय झाले? अहो! ६० मावळे व भिकाजी रसद घेऊन गडामागच्या बाजूने केदार दरवाज्यातून गडावर चढून गेला. हे ऐकून दिलेरखान काय मजेत नाचणार होता ? त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तो रागाने तांडव करू लागला. हे कशाने झाले? दिलेरखानाचे हेर चारही दिशेला सैरावैरा सुटले होते. काही हेर गुप्तपणे दक्षिण मोर्च्याच्या बाजूला काळदरीकडेही मार्गस्थ होते. त्यातल्याच एकाने मराठे गडावर सुखरूप पोहचल्याचे रसाळ वर्णन दिलेरखान साहेबांपुढे केले. त्या गुप्तहेराने हयाला जबाबदार असणा–या दाऊदखान कुरेशीच्या मस्तीचे व बेजबाबदार वृत्तीचे वर्णन करून आगीत तेलच ओतले. या खबरीने दिलेरखान पेटला. जळून खाक होता–होता वाचला. इकडे दाऊदखान मजेत जीवन जगत

होता. नमाज अदा करून छावणीबाहेर येऊन केदार दरवाज्यावर नजर टाकून स्वतःच्या पराक्रमाची स्वतःच तारीफ करत होता. दक्षिण बाजू अजुनपर्यंत राखल्याचा त्याला अभिमान वाटत होता. पण त्याला अजून रात्री घडलेली मराठयांची गंमत माहिती नव्हती. अजुन तो दाढी कुरवाळत हसत होता. अचानक संदेश घेऊन एक हेर आल्याची खबर त्याला मिळाली. तो छावणीत पोहोचला. त्या हेराने दिलेरखानाने बोलावल्याची खबर दिली. दाऊदखानाला वाटले दिलेरखान आपल्या कामावर खुश असावा. म्हणून शाबासकी देण्यासाठी बोलावत असावा. दिलेरखानाकडे दाऊदखान कुरेशी वा-याच्या वेगाने दौडत निघाला. काही समयातच तो दिलेरखानाकडे छावणीत पोहचला. दाऊदखानाला पाहून दिलेरखान चवताळला. त्याचा तलवारीला हात गेला. पण औरंगजेबाकडे त्याचे असलेले वजन ओळखून मन मारले. दिलेरखानाने प्रथम दाऊदखानाला त्याच्या कामाविषयी विचारले. दाऊदखानाने दक्षिणबाजूच्या मोर्च्यावर आपल्या कामाचे वर्णन केले. आपण पहारा किती कडक ठेवला आहे. चिमणीपाखरूही किल्ल्याच्या जवळ कसे फिरकत नाही याचे वर्ण न केले. हे ऐकून तर दिलेरखानाच्या रागाचा बांध फुटला. दाऊदखानावर तोफेचा नाही पण दिलेरखानाच्या

रागाचा गोळा पडला. दिलेरखानाने गुप्तहेराने दिलेल्या बातमीचे वर्णन दाऊदखानापुढे केले. 'तुझ्या त्या कठोर, कडक पहा–यातून मराठे रसद घेऊन गडावर कसे पोहचले? हे रसभरीत वर्णन ऐकून दाऊदखानाच्या बुडाखाली सुरूंग फुटल्याचा भास झाला. पण तोही खानच होता. औरंगजेबाचा खास होता. तो हया बातमीचा मुद्दाम इन्कार करू लागला. दिलेरखान पुराव्यासह पटवून देण्याचा प्रयत्न करत होता. परंतु दाऊदखान त्याच्या सैन्याविषयी, सरदारांविषयी, कडक पहा–याविषयी पूर्ण पणे ठाम होता. दोघांत तंटा पेटला होता. दोन गोल एकमेकांशी टकरले होते. कोणीही माघार घ्यायला तयार नव्हता. या भांडणाला अनेक साक्षीदार होते. महत्वाचा साक्षीदार म्हणजे 'मिर्झाराजे जयसिंग' होते. मिर्झाराजांच्यासमोर हे वादविवाद, जाबसाल चालले होते. मिर्झाराजे सांभाळूनच दोन खानांना समजावण्याचा प्रयत्न करत होते. परंतु खानयुद्ध जोरात चालले होते. दाऊदखानाला दिलेरखानाचे खोचक प्रश्न जाचत होते. दाऊदखान त्यांचे उत्तर न देता "स्वतःच्या पहा–यावर तु लक्ष दयावेस; माझी चिंता करू नये" असा मोलाचा संदेश देत होता. हे रण काही काळ चालले तर; बंडाळी निर्मा ण होईल ही भिती मिर्झाराजांनी ओळखली व खानांचे हे युद्ध

थांबवले. रागाने फणफणत दोघे खान एकमेकांकडे पाहत उभे राहिले. मिर्झाराजांच्या मेघगर्जनेपुढे खान बिचकले. पण ते एकमेकांकडे मारक्या बैलांप्रमाणे पाहत राहिले. शेवटपर्यंत दाऊदखानाने दक्षिणेकडील बाजूने उत्तम प्रकारे कार्य केले याचे कौतुक मिर्झाराजांनी केले. पण मराठे गडावर पोहचले ते दक्षिणेकडूनच याची खबर शांतपणे मिर्झाराजांनी दाऊदखानाला समजावून सांगितली. दाऊदखानाला आता ही बातमी खरी वाटली परंतू त्याचा अजुनही विश्वास बसत नव्हता. असे घडलेच कसे? "या अल्ला! ये मराठे है या हैवान! ये तो चेटूक है, हमारे पहरे से निकलना बहुत मुश्कील है, मगर मराठे कैसे निकले? " असे बुद्धीला खाज आणणारे प्रश्न त्याला पडले. पण तो दिलेरखानावर अजुनही चिडूनच होता.

दोन खानांच्या भांडणातून मिर्झाराजांनी एक सवलतीचा मार्ग काढला. दक्षिणेकडील बाजुला असलेल्या मोर्च्यावरून दाऊदखानाला बदलले व पुरदिलखान व शुभकर्ण बुंदेल्याची नेमणूक तेथे केली. दाऊदखानाला ७000 घोडेस्वार देऊन स्वराज्यात लुटालूट, जाळपोळ करण्यास, स्वराज्य उद्ध्वस्त करण्यास पाठवून दिले. दाऊदखान दिलेरवर एवढा चिडला होता की, तो मिर्झाराजांनी दिलेल्या कामगिरीवर

निघतांना छावणीत म्हणत होता, “मराठयांचा पुरंदर जिंकणे कठीण, एक किल्ला जिंकणे एवढे कठीण मग इतर किल्ले जिंकणे तर महाकठीण व सर्व प्रयत्न करूनही शिवाजीला परास्त करणे म्हणजे स्वर्गाला शिडी लावण्यासारखेच आहे. त्यामुळे "दिलेरखान नादान है, पुरंदर जितना पैसों की, लोगोंकी बरबादी है " असेच तो वारंवार बोलू लागला. हे ऐकून दिलेरखान भडकत होता. पण एका गोष्टीने तो शांत होता. ती म्हणजे दाऊदखान काही काळ तरी पुरंदर मोहिमेपासून दूर राहणार होता. म्हणत होता, ‘जाऊ दया कुत्रं भुंकायचचं, आपण आपलं काम करू या. ’ दाऊदखान फौजेसह निघून गेला. दिलेरखानाला आनंद झाला तर मिर्झा राजांनी सुटकेचा निःश्वास टाकला. नाही तर दोन जात्यांच्या तळीत मिर्झाराजांसारखे दळण भरडले गेले असते ना!

दाऊदखान गेल्यावर मोठया उत्साहाने दिलेरखान पुरंदरावर हल्ले चढवू लागला. एक-एक क्षण तो पुरंदराच्या विजयासाठी खर्चू लागला, त्याचे दिव्यस्वप्न एकच होते. पुरंदरवर विजय, शिवाजीचा पराभव! औरंगजेबाची शाबाशी! सरडयाची धाव कुंपणापर्यंतच! दिलेरखानाच्या सैन्याच्या तुकडया किल्ल्यावर चढण्याचा प्रयत्न करत होत्या. मधूनच त्यांचा प्रतिकार मराठे करत होते.

वर चढणा-या मोंगलांचे स्वागत दगडरूपी फुलांनी केले जात होते. भूमीवर रक्ताचा अभिषेक होत होता. अनेक मोंगलांचा जन्म महाराष्ट्राबाहेर झाला होता. पण त्यांना मरण महाराष्ट्राच्या पवित्र भूमीवर आले. खरचं महाभाग्यचं त्यांचं! गडाखालून लढाईचा पूर्ण प्रयास चालू होता. लवकरच गड ताब्यात यावा अशी मनिषा दिलेरखानाची होती. प्रयत्न तत्परतेने चालले होते.

दिलेरखानाची लगीनघाई खाली चालली होती. तर गडावरही मुरारबाजी हातावर हात धरून शांत बसले नव्हते. भिकाजी व काही मराठयांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन दक्षिणेकडच्या मोंगली मोर्च्यावर अचानक हल्ला केला. रसूलबेग रोझभानीच्या मोर्च्यावर हल्ला झाला. या हल्ल्याने रोझभानी बावचळला. त्याला काही काळ काय झाले ते कळलेच नाही. तोपर्यंत इकडे मराठे वीरांनी आपले काम तंतोतंत पार पाडले होते. हातात लोखंडी मेखा, हातोडे घेऊन आलेल्या मराठयांनी मोंगल सैन्याला चांगलेच सडकून काढले. फुटलेली कपाळं, डोकी, मोडलेले हात घेऊन मोंगल सैरावैरा धावू लागले. रोझभानीला काय करावे सुचत नव्हते. इकडे भिकाजी रोझभानीच्या महत्त्वाच्या तोफेवर चढला. पुढे काय? काय म्हणजे, जी तोफ आग ओकत

होती, पुरंदरच्या मुळावर उठली होती, तिचे तोंडच कायमचे बंद करायचे त्याचा निश्चय होता. त्याने हातातली मेख घेतली व सरळ जेथे तोफेला आग दिली जाते त्या छिद्रात ती सढळ हाताने ठोकली. बिचारी तोफ पूर्णपणे बहिरी झाली व कायमची निकामीही. अशा सर्व तोफा बहि-या करण्याची लीला मराठयांनी केली. काय कौतुक त्या मराठयांचे, काय कसब त्या भिकाजीचे. कमी वेळात आपली कामगिरी कशी साधावी? हे मराठयांनीच साधावे. मोंगलांचा एक मुडदा पडला व चौदा मोंगल जखमी झाले होते. तर मराठयांचे मात्र दुर्दैवाने चार खंदे वीर धराशयी पडले. शत्रूची नवी कुमक येईपर्यंत हातचे काम करून सर्वजण 'केदारदरवाजाच्या आत'कधीच गुडूप झाले होते. मोंगल अंधारात त्यांना काळदरीत शोधू लागले. पण मराठे त्यांना सापडले नाहीतच. मराठयांचा दणका बसल्याने मोंगल चांगलेच दणाणले. "ये मराठे तो हैवान है, शैतान है , या अल्लाह! ये कैसे लोग तुमने पैदा किये है? " असा निर्वाणीचा प्रश्नच ते अल्लाला विचारत. काय करणार आणखी दुसरे? मोंगलांना सवयच लागली होती. पावसाने झोडपावे, मराठयांनी सडकावे तक्रार कोणाकडे करायची? अल्लाकडेच ना? रोझभानी तर चांगलाच गडबडला होता. एकीकडे दिलेरखानाची गैरमर्जी होऊ नये

म्हणून मराठयांना तोफा, बंदुका, तलवारी, भाले, बर्ची यांनी आक्रमण करणे व दुसरीकडे मराठयांचा रौद्ररूपी अवतार! येणा–या सामन्याला तोंड दयायला तो तयार झाला. दिलेरखानाच्या हेरांनी खानापर्यंत ही गुप्त गोष्ट पोहचवली. खानाच्या डोक्याला मुंग्याच आल्या. काय म्हणावे या मराठयांच्या हिंमतीला आणि त्यांच्या वेडेपणाला. 'हे मराठे मरणाला घाबरत का नाहीत ?' हे कोडेच खानाला पडले. तो थोडा शांतच झाला. नवीन योजना आखण्याची तयारी करू लागला.

मिर्झाराजांची व खानाची भेट झाली. ठरवूनच दिलेरखान मिर्झाराजांना भेटला. नवीन योजनेविषयी चर्चा सुरू झाली. मिर्झाराजांनी आपला मनसुबा मांडला. शेतात राखणीसाठी जसे उंच माचवे अथवा धमधमे बांधतात तसे माचवे गडाच्या माचीलगत उभारायचे व या माचव्यांवर जड, अवजड तोफा चढवायच्या, बंदुक घेऊन स्वार चढवायचे व समोरा–समोर मराठयांवर आक्रमण सुरू करायचे. विचार–विनिमय झाला व कामास सुरूवात ही झाली. काहीही करून लवकरात लवकर पुरंदर हाती पडावा ही मनिच्छा खानाची होती. त्यासाठी तो कोणताही मार्ग अवलंबायला तयार होता. धमधमे उर्फ माचवे तयार झाले. माचव्यांची व

माचीवरील काळया बुरूजाची उंची समान झाली. दिलेरखानाने लगेच त्यावर तोफा चढवण्याची आज्ञा दिली. आज्ञेला मोंगलांच्या अचाट शक्तीची साथ मिळाली व दोरांच्या सहाय्याने तोफा माचव्यांवर चढवल्या गेल्या. गनिमांच्या तोफा पुरंदराच्या छाताडापर्यंत पोहाचल्या. पुरंदरची छाती धडधडू लागली. स्वतःचे मरण पुरंदराला जवळ वाटू लागले. दिलेरखानाला स्वर्गीय आनंद झाला. माचव्यावरूनच स्वर्गात जावे असे त्याला वाटू लागले. कसेही करून लवकरात लवकर आक्रमण सुरु होऊन सफेद बुरूज पडावा. नंतर काळा बुरूज व लवकरच संपूर्ण पुरंदर आपल्या हातात यावा. असे खानाला वाटत होते. खान खुशीत होता. सफेद बुरूजाचा अंदाज घेऊन तोफगोळयांचा व हुक्कयाचा, बंदुकीच्या गोळयांचा वर्षाव सफेद बुरूजावर सुरु झाला. मराठे काही कमी अकलेचे नव्हते. धमधमे उर्फ माचवे तयार होण्याच्या सुरूवातीपासूनच मराठयांना खानाच्या अकलेची पूर्ण कल्पना आली होती. योजना समजली होती. "तुम्ही माचवे बांधा, तोफा माचव्यांवर चढवा आक्रमण सुरु करा. मग बघा आमचा चमत्कार! असा विचार प्रत्येक मराठयांचा, मुरारबाजींचा व भिकाजीचा होता. झालं, मोंगलांचा तोफखाना आग बरसू लागला. मुरारबाजींनी तातडीचा आदेश

आपल्या मराठ्यांना दिला. सफेद बुरूजावरून मराठ्यांच्याही तोफा आग बरसू लागल्या. मोंगलांच्या तोफा जोशात डागल्या जात होत्या. मोंगल जोशात होते. परंतू मराठे? मराठे फक्त जोशात नव्हते तर; ते मरण्याच्या व मारण्याच्या तयारीने लढत होते. ते बेहोश होऊन लढत होते. शिवाजीराजांसाठी पुरंदराचा जीव वाचवण्यासाठी. तोफांचा कर्णकर्कश आवाज, गगनभेदी किंकाळया, उडणारा धुरळा यांनी आसमंतात कल्लोळ माजला होता. दिलेरच्या पहिल्या तुकडीत मराठ्यांनी जबरदस्त उत्तर दिले. मिर्झाराजांची व दिलेरखानाची अनेक माणसं ठार झाली. नंतर मिर्झाराजांचे अनेक राजपुत व दिलेरखानाचे झबरदस्तखान व मीर-आतीशखान हे मोर्च्यावर आले. पण मराठ्यांच्या वादळापुढे त्यांच्या मुसक्या आवळल्या गेल्या. पुढे भूपतसिंह हा पाचशे पठाण घेऊन आला परंतू मराठ्यांनी असा दणका दिला की, भूपतसिंह या दणक्याने शिवसदनी रूजू झाला. म्हणजे ठार झाला. मराठ्यांत जबरदस्त उत्साह संचारला होता. मोंगलांनी यावे व मार खाऊन, अपमानीत होऊन परत जावे असे ठरल्याप्रमाणे घडत होते. मराठे त्वेषाने लढत होते. मराठ्यांचा वाढता जोश दिलेरखानाला चिंतेत टाकत होता.

मुरारबाजी व भिकाजी आपल्या मराठा सहका–यांवर जबरदस्त खुश होते. पुढचं पाऊल टाकण्याची तयारी चालू होती. पुढचं पाऊल टाकण्याची तयारी चालू होती. पुढे दिलेरखान व कीरतसिंग उंच धमधम्यावर सफेद बुरूजावर लक्ष टाकत असतांना त्याच्या सैतानी डोक्यात एक युक्ती सुचली. सफेद बुरूज तोफेने पडणे शक्य नाही. काहीतरी करून सफेद बुरूजाखाली बारूद ठेवावा व इथून त्याला बत्ती दयावी असा कुविचार त्याच्या मनात आला. याची पुसटशी कल्पना कशी कुणास ठाऊक मुरारबाजींना होतीच. भिकाजीने त्याला सल्ला दिला की, सफेद बुरूजाच्या मागे असलेल्या काळया बुरूजाखाली भरपूर दारूगोळा आणून ठेवावा. जर सफेद बुरूज पडला व शत्रू सैन्य आत येऊ लागले तर त्या दारूला बत्ती दयावी. नक्कीच शत्रूचे अनेक वीर मरण पावतील. मुरारबाजींना ही योजना पटली व त्यांनी दारूगोळयाची अनेक पोती काळया बुरूजाच्या जवळ आणून ठेवली व मुरारबाजी शत्रूच्या पुढच्या हालचालीकडे लक्ष लावून होते. त्यांना माहीत होते. शत्रू शांत बसणारा नाही. आपण सदैव तयार असले पाहिजे. शत्रू सैन्य मोठं आहे. आपली संख्या फारच तोटकी आहे. त्यांच्याकडे सैन्य, धन, दारूगोळा सगळं आहे. पण आमच्याकडे शिवाजीराजांचा आशीर्वाद,

प्रचंड आत्मविश्वास, गरीब मावळयांची प्रचंड व अचाट ताकद आहे. प्रत्येक मावळा मोंगलांसाठी यमदूतच होता. भाजी–भाकरी कांदा भाकर खाऊन, ओहळावरचं, ओढयातलं पाणी पिऊन शरीर कमावलेला मावळा झुंजत होता. मरत होता, मारत होता. प्रत्येकाने पूजा मांडली होती. यज्ञ मांडला होता. येथे कमळाऐवजी 'शीरकमळे' अर्पण केली जात होती. सिंदुराऐवजी 'रक्ताचं शिंपण' मराठे अर्पण करत होते.

मुरारबाजी, भिकाजी व किल्लेदार मोंगलाच्या पुढच्या योजनेचा पाडाव करण्यास तयार होती. संध्याकाळची वेळ असेल अचानक कर्णकर्कश अशा 'धडामधड' अशा ध्वनींनी संपूर्ण आसमंत धडाडले. मुरारबाजींना हुज–याने तातडीने ती वाईट खबर सांगितलीच. सफेद बुरूजावर मोंगलांशी लढणारे ८० मावळे अचानक सुरूंगाच्या स्फोटाने आकाशात उडाले. त्यांच्या चिंधडया झाल्या. शिवाजी राजांसाठी लढता–लढता मुकाटपणे, एकमुठीने कैलासाला गेले. काय म्हणावे नियतीला! असा काय गुन्हा होता त्यांचा? धन्यासाठी लढणे हा गुन्हा? स्वराज्यासाठी लढणे हा गुन्हा? मग तर तो आम्ही पुन्हा पुन्हा करणार . असा मराठी बाणा होता. नक्की झाले तरी काय? विचारपुस केल्यावर समजले की, सफेद बुरूजावर शत्रूसाठी ठेवलेल्या दारूगोळयाच्या ढिगा–यावर पेटता पलिता

पडला व अचानक दारूगोळयाने पेट घेतला व स्फोट झाला. मुरारबाजी, किल्लेदार व भिकाजीची वाचाच बसली. त्यांना काहीच उमगेना झाले. काही क्षण डोळयांपुढे अंधारी आली. भिकाजीला स्वतःची चूक महाग पडल्यासारखे वाटले. पण मुरारबाजींनी त्याला दोष न देता दैवाला दोष दिला. मुरारबाजींपेक्षा आता भिकाजी जास्त चवताळला होता. आता लढाई – निर्वाणीची लढाई. आता मेलो तरी चालेल, पण मोंगलांना सोडायचे नाही. पुरंदरावरनं मोंगली फौज माघारी घालवायची तोवर महाराजांना तोंड दाखवायचे नाही अशी शपथ भिकाजीने घेतली. तो खजील झाला होता. ८० मावळयांच्या मरणाला तो स्वतःला जबाबदार मानत होता. मनाने खंगला होता. पण त्याचा जोश, द्वेष व कडवेपणा आता पूर्वीपेक्षा जास्त होता. चेहरा राकट दिसत होता. काळाकभिन्न देह आसुसला होता. शत्रूची दाणादाण उडवण्यासाठी.

सफेद बुरूज आपोआप आकाशात उडाल्याने दिलेरखानाला केवढा आनंद झाला म्हणून सांगू! त्याने नमाज पढून अल्लाचा शुक्रीया अदा केला. सफेद बुरूज पडल्याने मागे असलेला काळा बुरूज उघडा पडला होता. मोंगली सैन्य काळया बुरूजाजवळ पोहचले. परंतु मराठयांनी मोंगलांना

साक्षात दर्शन दिले. मोंगली तोफा दणाणू लागल्या. मराठयांचाही चोख मारा सुरू होताच. सहा दिवस हे विषम युद्ध सुरू होते. कारण शत्रूची फौज हजारांत होती, तर मराठे शेकडोंच्या घरात होते. सहाव्या दिवसानंतर मात्र मोंगलांच्या नव्या दमाच्या सैन्यापुढे मराठे कच खाऊ लागले. नाईलाजाने त्यांना माघार घ्यावी लागली व मराठी फौज बालेकिल्ल्यापर्यंत मागे सरकली. अशा त–हेने काळा बुरूज, पुरंदराची माची म्हणजे मुख्य किल्ला मोंगलांच्या अर्थात दिलेरखानाच्या ताब्यात गेला. दिलेरखानाची सरशी झाली. दिलेरखान आपल्या सैन्यावर व त्यांच्या कामगिरीवर निहायत खुश झाला. आता मोहिम बालेकिल्ला! लवकरात लवकर बालेकिल्ला हातात मिळवण्याचा मानस दिलेरखानाचा होता. मार्गक्रमण सुरू झाले. मोंगली सेना चवताळली होती, चेकाळली होती, आरोळया ठोकत होती. लवकरच बालेकिल्ल्याच्या 'सर' दरवाजाकडे चढाईचा हुकूम सुटला. मोंगली फौज रोरावत 'सर' दरवाजापुढे सरकू लागली. परंतु मराठयांच्या सावध पावित्र्यापुढे 'सर'दरवाजा गाठणे म्हणावे एवढे सोपे नव्हते. दिलेरखानाला पुढे जायचे होते. पण मुर्दाड मराठे अडथळा होते ना! आता काय करायचे? अचानक वीज चमकावी तशी चर्रकन एक योजना

त्यांच्या डोक्यात आली ती योजना म्हणजे पाच हजार निवडक पठाण व बहलिया जातीच्या हशमांबरोबर ‘सर’ दरवाजावर अचानक ‘सुलतान ढवा’ करण्याची! असा‘सुलतानढवा’ जसवंतसिंहाने एका वर्षापूर्वी ‘सिंहगडावर’ केला होता. मात्र जागरूक किल्लेदारांमुळे त्याचा फज्जा उडाला होता, पण तो जसवंतसिंग होता व हा दिलेरखान जबरदस्त हट्टी, मनस्वी व क्रुर सेनानी होता. त्याची सुलतान ढव्याची तयारी जोमात चालली होती.

सर दरवाजा फारच महत्वाचा. इतिहासही महान. या सर दरवाज्याजवळच नाईकांची लक्ष्मीआई वास करत होती. आशीर्वाद देत होती. तिच्या जीवावरच नाईक मंडळींचा पराक्रम घडत होता, सजत होता. वर्षाच्या वर्षाला येथे जत्रा भरत होती. रामोशी, कोळी, हरिजन मंडळी आदराने या जत्रेत सामील होत होती. बोकडं कापून, निवद देऊन, खणा-नारळाची ओटी देऊन आईचा मानसन्मान केला जात होता.

बालेकिल्ल्याला आत चोवीस बुरूज होते. परंतू सगळयांत महत्त्वाचा बुरूज म्हणजे शेंद-या बुरूज आभाळाला टेकेल अशी उंची, भक्कम ताशीव कडे, काळेकभिन्न पत्थर

यांचे लेणे लेवून शेंद-या बुरूज सजला होता. तसं पहायला गेले तर शेंद-या बुरूज व चिव्हेवाडी हे समीकरण फारच जुने होते. भिकाजीच्या कुळातील येसाजी नाईक चिव्हे या पराक्रमी पुरूषाच्या औदार्यापुढे तर हा शेंदरी बुरूजच नव्हे तर संपूर्ण पुरंदर ऋणी होता. असं येसाजी नाईकांचं काय योगदान होतं? पुरंदरवरच्या काही बुरूजांचे बांधकाम पूर्ण झाले होते. आता शेंद-या बुरूजाचे काम सुरू होते. काळया पत्थराच्या राशीच्या राशी बांधकामासाठी आणल्या होत्या. चुन्यात हे बांधकाम चालू होते. कारागीर जबाबदारीने हे बांधकाम करत होते. गवंडी आपले कसब वापरून बांधकाम करत होते. पाया मजबूत बांधून घेऊन काम पूर्णत्वाकडे चालू होते. पण काय झाले कुणास ठाऊक अचानक बांधकाम कोसळले. पुन्हा बांधकाम रचण्यास सुरूवात झाली. पुन्हा ते अर्ध्यापर्यंत आले व ढासळले. अनेकवेळा बांधकाम करूनही 'शेंद-या' बुरूजाचे काम पुर्णत्वास जात नव्हते. किल्लेदारास व शिल्पकारास काय करावे काही कळत नव्हते. गडावर थोडे चिंतेचे वातावरण पसरले होते. गडावर थोडे चिंतेचे वातावरण पसरले होते. अनेक शंका-कुशंकांना वाट मिळाली होती. अनेकांना या जागेविषयी शंका होती. अनेक तांत्रिक, मांत्रिकांना विचारणा केली असता निष्कर्ष

एकच निघाला. हा महत्त्वाचा बुरूज आहे. त्याचं बांधकाम करतांना बळी देणे गरजेचे आहे. शेंद-या बुरूजाचे मजबूत काम व्हावे असे वाटत असल्यास लग्न झालेले नवे जोडपं बळी म्हणून दिल्यास बांधकाम व्यवस्थित पार पडेल. यात तीळमात्र शंका नाही. तसाही हा बुरूज पुरंदरचे नाक होता. बालेकिल्ला मजबुतीसाठी शेंद-या बुरूजाला उभारणे गरजेचे होते. पण अशक्य असे आव्हान कोण स्विकारणार? वरील आवाहन ऐकून अनेकांनी माना खाली घातल्या. पण नाईक जातीतलं एक रत्न पुढं झालं. कोण बरं? कोणत्या गावाचं हे रत्न होतं? 'अहो, या रत्नाला येसाजी नाईक म्हणत्यात!' गांव चिव्हेवाडी. पुरंदरच्या पंचक्रोशीतलं हे गांव. पुरंदरावरची 'लक्ष्मीआई' हे त्यांच दैवत. जत्रेत 'लक्ष्मीआई ' समोर 'निवदाचा'पहिला मान येसाजी नाईकांच्या पिढीला पुर्वापार चालत आला होता. मांत्रिकाचं आव्हान येसाजीरावांनी स्विकारावं. 'माझा पोरगा अन् सून जाईल बळी म्हणून', त्यानं घोषणाचं केली. पुरंदरापेक्षा त्यांना आपला मुलगा व सून प्रिय नव्हती. धन्य ते येसाजी, धन्य ते स्वराज्य व धन्य तो मराठी मुलुख. या मुलुखावरून जीव ओवाळून टाकावा. कारण याच मातीनं येसाजी सारखे नि:स्वार्थी जीव निर्माण केले. त्या मातीला शतश: मुजरा!

शेवटी येसाजीच्या सांगण्यावरून येसाजीचा जेष्ठपुत्र व सुन बळी जाण्यास तयार झाले. वडिलांच्या आज्ञेपेक्षाही काकणभर जास्त त्यांना स्वराज्यासाठी त्यांना प्राण देण्याची तहान लागली होती. हसत-हसत त्यांनी होकार भरला. नवीन पोशाख त्यांना चढवण्यात आला. सूनेलाही हिरवंगार लुगडं नेसवलं गेलं. कुंकवाने मळवट भरला गेला. दोघांचीही विधीवत पुजा करण्यात आली. वाजत-गाजत मिरवणूक शेंद-या बुरूजाच्या बांधकामाकडे आली. तिथेही त्यांचा मानसन्मान केला. बांधकामाच्या आत त्यांनी अभिमानाने प्रवेश केला. आजुबाजूला बांधकाम खडे होऊ लागले. काही समयातच हे बांधकाम पूर्णत्वास गेले व काय विशेष यावेळी मात्र शेंद-या बुरूजाचे बांधकाम मात्र सोळा आणे पूर्ण झाले. सर्वांना आनंद झाला. पण तो आनंद थोडयाच काळात विरला. प्रत्येकाला येसाजी, येसाजी रावाच्या मुलाची व सूनेची याद आली. सर्वा ंच्या डोळयांच्या कडा ओल्या झाल्या. बांधकाम पूर्ण झाले पण जीवा-भावाची माणसं गेली म्हणून दु:ख होतं. पण येसाजीच्या चेह-यावर हे दु:ख जराही जाणवत नव्हतं. उलट त्यांना पुरंदरासाठी माझा उपयोग झाला या भावनेनेच त्यांना अभिमानाचे भरते आले होते. असा रक्ताचा संबंध पुरंदर व चिव्हेवाडीचा होता. भिकाजीला मात्र

घटनेचा विशेष अभिमान होता. धन्य ती चिव्हेवाडी व धन्य ते नाईक कुटूंब!

सुलतान ढव्याची योजना रूजत होती. बरोबर त्याच वेळी बालेकिल्ल्यावर किल्लेदार, मुरारबाजी व भिकाजी यांचीही एक योजना प्रसुत झाली होती. निर्वाणीच्या लढाईचा तो बेत होता. अखेरची लढाई. जीव जावो अथवा राहो. मोंगलांना पुरंदरचे व मराठयांचे सामर्थ्य कळलेच पाहिजे. शिवाजींचे कच्चे-बच्चे मरणाला कधीच घाबरत नाहीत. स्वराज्यासाठी ही मंडळी दहा वेळा मरण स्विकारायला तयार होती. योजना आखली गेली. मुरारबाजींनी किल्ल्यावर उपलब्ध सैन्यातून शेलके ७00 मावळे निवडले व दिलेरखान सुलतान ढवा करण्याअगोदर आपणच त्याच्यावर 'वाघाची झडप' घालायची असा बेत त्याने आखला. भिकाजीही त्या ७00 मध्ये होताच. तो या संधीची केव्हापासून वाटच पाहत होता. मोंगलांचे पाच हजार पठाण 'सर' दरवाजाकडे वादळासारखे सरसावले. वरून भिकाजी व मुरारबाजींनी हे पाहिले. 'सर' दरवाजा उघडला गेला. मुरारबाजींचे ते वाघाच्या दिलाचे, नेक मावळे पाच हजार मोंगलांवर तुटून पडले. प्रचंड रणकंदन माजले. बंदुकीच्या फैरी झडू लागल्या. तलवारींचा खणखणाट ऐकू येऊ लागला,

मारा–कापाच्या आरोळयांनी आसमंत दुमदुमून गेला.

मुरारबाजींचा व भिकाजीचा आवेश पाहून मोंगली सैन्याची पाचावर धारण बसली. मुरारबाजी म्हणजे तांडव करणारा रूद्र शोभत होते. भिकाजी त्याचा गण. या दोन्ही वादळांना थोपवणे मोंगलांना शक्य होत नव्हते. दोघांच्याही तलवारीखाली येणारे प्रत्येक शरीर धडहीन होत होते. मुरारबाजींच्या तोडीला तोड देणारा एकही मोंगल सरदार दिसत नव्हता. मोंगलांच्या खांडोळया केल्या जात होत्या. भिकाजी त्यावर कहर करत होता. त्या ऐंशी मावळयांची याद त्याला सतावत होतीच. ती जखम अजुन हिरवीच होती. त्या रागाने, क्रोधाने तो शत्रूचे खंडन करत होता. त्याच्या डोळयांतून लालबुंद रस टपकत होता. तो क्रोध पाहून लढण्याअगोदरच मोंगलांचे अर्धे बळ संपुष्टात येत होते. रक्ताचे पाट पुरंदरच्या भूमीवर वाहत होते. आरोळया, किंकाळयांनी आसमंत दुमदुमुन गेला होता. अशी लढाई व असे वीर पुन्हा नाहीत मिळणार बघायला असे दृश्य निर्माण झाले होते. साक्षात शिवाचे ‘रणकंदन’ चालू होते. मुरारबाजीचा विध्वंस पाहून दिलेरखानही अचंबित झाला. छावणीत माघारी गेला. काहीतरी विचार करून पुन्हा माघारी आला. त्याचा रोख मुरारबाजींवर होता.

मुरारबाजींसमोर येऊन त्याने त्याची तारीफ सुरू केली. त्याला जहागिरी, इनाम देण्याचे आमिष दाखविले. आमिषाला, इनामाला बळी पडण्याचे दिवस आता संपले होते. मराठे आता इनामासाठी नाहीतर इमानासाठी लढत होते. मुरारबाजी त्यांच्या बोलण्याने संतापला, त्यांच्यावर थुंकला व त्याने चटकन उच्चार केला, "बादशहाचा कुत्रा म्हणून जगण्यापेक्षा शिवाजी महाराजांचा मावळा म्हणून मरणे मला नेहमीच प्रिय राहिल; तुझ्या त्या इनाम-बक्षिसांना लाचारांसाठी शिल्लक ठेव मला त्याची गरज नाही. फितुरीची भाषा मला शिकवतोस? या मुरारबाजीला? जीव देईन पण; महाराजांशी बेईमानी कदापिही नाही. सावध हो आणि पुरंदरावरून निघून जा, नाहीतर तुझा अंत जवळ आलाय! "एवढे बोलून चवताळून मुरारबाजी खानावरच धावत सुटले. खानही सावध होताच. त्या पावित्र्यातच निर्दयी खानाने धनुष्यातून बाण सोडला व तो बाण मुरारबाजींच्या कंठात शिरला. शिवचैतन्य हरपले. वादळ शमले. मुरारबाजींचा देह धरणीवर पडला. मराठयांना खबर लागताच तो देह उचलला गेला. भिकाजी व त्याच्या सहका-यांनी तो देह 'सर' दरवाज्यातून आत आणला. जवळपास तीनशे मराठे काळाच्या पडद्याआड गेले व जवळपास पाचशे पठाण व बहलिये ठार झाले. असा हा खंदा वीर काळ

झाला. मानाचा मोती गळून पडला. गडावर त्या रात्री दुःखाचेच वातावरण होते. आपल्या नेत्याच्या मरणाने सर्व दुःखी झाले होते. पण निर्धार, निश्चय कमी झाला नव्हता. उलट मुरारबाजींच्या बलिदानाने मराठयांच्यात नवचैतन्य स्फुरले होते. एक नेता पडला म्हणून काय झाले. महाराजांची शिकवणच होती. एक पडला तर दुसरा! दुसरा पडला तर तिसरा! बलिदानाची माळ परंपरा अखंड ठेवा. एक शिवाजी पडला तर तुम्ही स्वराज्याचे शिवाजीच आहात. स्वातंज्य, स्वराज्य जगवा, वाढवा! किती पवित्र शब्द होते महाराजांचे. अशा पवित्र शब्दांना जागुनच एक ज्योती मृत्यूच्या कवेत विसावली होती. पण ही ज्योती विझतांना अनेक ज्योतींना तेज देऊनच निघून गेली होती. जिद्द कायम होती. काही झाले तरी पुरंदर पडता कामा नये असा निर्धार पुरंदरचा किल्लेदार व भिकाजी करत होता. सफेद बुरूज, काळा बुरूज पडला तरी 'सर' दरवाज्यावर मराठयांचा 'भगवा' अभिमानाने फडकत होता. महाराजांना ठणकावून सांगत होता. 'राजं, काय बी घाबरू नका. एक मुरारबाजी गेले म्हणून काय झालं? स्वराज्यानं असे अनेक मुरारबाजी तयार केलेत. एक-एक मुरारबाजी संपवेपर्यंत दिल्लीश्वराची यवनी सत्ताच संपेल.'

केवढी अचाट ताकद होती मराठयांची. तो तेजस्वीपणा, तो दिमाख कसा वर्णावा? लेखणीतली शाई आटेल; पण मराठयांचे कर्तृत्व, श्रेष्ठत्व मापता येणार नाही.

ती रात्र दिलेरखानासाठी फारच खुशीची होती. मुरारबाजी पडले म्हणजे पुरंदर काबीज झाला असा दृढनिश्चय त्याचा झाला. सकाळ होताच शेवटचा हल्ला करायचा व पुरंदर काबीज करायचा असा त्याचा निश्चय झाला. खुशीत जेवला, खुशीत झोपला, स्वप्नातही पुरंदर जिंकल्याचा त्याला आभास होत होता. मराठी फौजही सकाळचीच वाट पाहत होती. सकाळी सकाळीच सूर्यनारायणाच्या सूर्यकिरणांबरोबर मराठे मोंगलांवर बरसण्यास तयार झाले होते.

ती निशा सरली. उषा गालात हसत आली. सूर्योदय झाला. मोंगली सेना चवताळून 'सर' दरवाजा वर धडकली. खानाचा तो भयंकर हल्ला पाहून मराठे थोडे बावचळले. परंतु आता एकच झटका दयायचा ठरवून भिकाजी मोजक्या सैन्यासह शत्रूवर तुटून पडला. मराठयांतल्या त्या हरिजन पोरांनी, रामोशांनी, कोळयांनी निकराचा लढा सुरू केला. कसोटीची ती लढाई सुरू झाली. भिकाजी हशमांवर

तुटून पडला. शत्रूची डोकी उडू लागली. मराठयांच्या दगडाखाली सापडून डोकी फुटू लागली, चेंदामेंदा होऊ लागला. दगड-धोंडे, कु-हाडी, तलवारी, कोयते, काठया जे सापडलं ते घेऊन मराठे झुंजत होते. पठाण व बहलिए पुरते भांबावले होते. काल तो हैवान मुरारबाजी आणि आज हा दुसरा सैतान भिकाजी, 'या अल्ला, कसली ही मराठयांची माणसे, एकापेक्षा एक विचित्र, एकापेक्षा एक विलक्षण. यांना हरवणं म्हणजे दिव्यचं!' घनघोर संग्राम चालला होता. दिवस जस-जसा चढत होता; तसे तलवारीचे, बंदुकीचे बळ वाढत चालले होते. आक्रोश, चीड वाढत चालली होती. वातावरणात ललका-या, कर्णकर्कश रणभेदी किंकाळयांनी एक विशिष्ट भीती निर्माण केली होती. भिकाजी चवताळून शत्रूवर तुटून पडत होता. थोडयाशा मराठयांना हरवणे हजारो पठाणांना व बहलियांना कठीण जात होते. संध्याकाळचा सुमार होता. अनेक मराठे वीर पठाणांना उजवे ठरत होते. पण नव्यादमाच्या हशमांपुढे मराठे माघार घेऊ लागले. परंतु अजुन त्यांचा दम थकला नव्हता. भिकाजीने पुन्हा एकदा मराठयांना आरोळया ठोकून, शिवाजी महाराजांची आन घालून परत लढण्यास प्रवृत्त केले. मावळयांनी पुन्हा हल्ला चढवला. भिकाजीची चैतन्य निर्माण करण्याची योजना सकल

झाली. दिलेरखानाच्या फौजेत हलकल्लोळ उडवून निर्वाणीची लढाई भिकाजी लढत होता. दिलेरखानापर्यंत ही बातमी पोहचली. त्याला झटकाच बसला. आता काय म्हणावं या मराठयांना, आहे रावणासारखे, एक मारला तर दुसरा उभाच. मुरारबाजींना मारल्याचा त्याचा जोश पूर्ण ओसरला. आता भिकाजीला संपवावे. हा एकच निश्चय त्याने केला. नेतेच संपवले तर बाकीचे मराठे काय दम काढतील? किल्ला सर होण्याच्या मार्गावर असतांना असले भिकाजीसारखे काटे उपटलेच पाहिजेत. लवकर उपटले पाहिजेत. या निर्धाराने स्वत: तलवार घेऊन तो मोर्च्यावर आला. भिकाजीला लढतांना पाहून खान चरकलाच. अरे, हा तर दुसरे मुरारबाजीच. याला आता कसा संपवायचा? असा विचार त्याच्या नासक्या डोक्यात आला. अचानक एक कल्पना उमटली. काहीही करून 'सर दरवाज्याच्या' उजव्या बाजूला म्हणजे किल्ल्याच्या दक्षिण बाजूला लढत-लढत नेऊन भिकाजीला एकटे पाडायचे, हशमांनी रिंगण करून त्याच्यावर चौफेर हल्ला चढवायचा. कुठे जाईल 'काफीर'. महाभारतात जसा अभिमन्यू सापडला तसाच भिकाजीला संपवण्याचा निर्धार खानाचा होता. योजना अंमलात आणली गेली. भिकाजी निष्ठा, पराक्रम यांच्यासह लढत होता, तर

खान कपटाने दुर्बुद्धीने लढत होता. समय वाढत चालला होता. दिवस मावळतीला लागला होता. कीरातसिंहाच्या नेतृत्वाखाली एका दलाने अचानक भिकाजीवर हल्ला सरू केला. भिकाजी त्यांच्याशी निकराने लढू लागला. इतर मराठे मावळे त्याला मोंगली सैन्याच्या वेढयातून बाहेर काढण्यासाठी जीवावर उदार होऊन लढत होते. पण खानाची सेना व कीरतसिंहाची राजपुत सेनेपुढे मराठी सेना थोडी गडबडली. याचाच फायदा खानाच्या निसबतीतील ठरलेल्या मोंगली सेनांनी घेतला. परिणामी भिकाजीभोवती फास चांगलाच आवळला जाऊ लागला. भिकाजी एकटा पडू लागला. कोशीश करूनही मोंगलांनी एकाही मावळयाला त्याच्या जवळ पोहचण्यास संधी दिली नाही. भिकाजी चक्रव्युहात फसला होता. भिकाजीला मृत्यूची चाहूल लागली होती. त्याच्या चेह-यावर थकल्याची जाणीव झाली. तो 'गलितगात्र' होऊ लागला होता. लवकराच आपण जाणार हे त्याला उमगले; पण शेवटपर्यंत निकराचा लढा दयायचाच हा त्याचा निर्धार कायम होता. आता मात्र तो चवताळला होता. मरायचे पण एवढया सोप्या रितीने नव्हे. मोंगलांना, विशेषत: दिलेरखानाला अद्दल घडवूनच मरायचे हा निश्चय त्याने केला. त्याची दुधारी तलवार चौफेर फिरत होती.

तलवारीखाली जवळपास दहा हशम पडून जमिनीवर गडबडा लोळत होते. तो चवताळून हल्ला चढवत होता. पण किती वेळ टिकणार तो एकेरी सामना? अखेर शरीरावर जखमांची संख्या वाढत गेली. राजपुतांचे ते कडवे वार तो फार काळ टिकवू शकलाच नाही. अचानक सेनानीचा छुपा वार भिकाजीच्या जिव्हारी लागलाच. भिकाजी कळवळला. त्या सेनानीची दुधारी तलवार भिकाजीचा देह चिरत आरपार गेली. तशा स्थितीतही भिकाजीने त्या सेनानीच्या देहाचे दोन तुकडे केले. परंतु तोपर्यंत वेळ बरीच निघून गेली होती. चवताळलेली मोंगली सेना भिकाजीवर तुटून पडली. वारांवर वार होऊ लागले. भिकाजी त्या वारांपासून वाचण्याचा प्रयत्न करत होता. पण आक्रमण एवढे निर्दयी व कठोर होते की, काही क्षणांतच भिकाजीच्या शरीराचे दोन तुकडे झाले. धड व मुंडके जमिनीवर विलग होऊन पडले.

सूर्यास्त झाला होता. तिकडे सूर्य मावळला होता तर इकडे शिवाजी महाराजांचा एक सूर्य ही मरणाच्या वाटेवर अस्ताला गेला होता. रजपूती, बहलिए सैन्य आरोळया ठोकू लागले. तो कल्लोळ, किंकाळया, विजयाच्या ललका–या मराठयांपर्यंत पोहचल्याच. भिकाजीच्या देहाभोवती मोंगलांचा नंगानाच सुरू होता. मराठयांना आपला नेता पडल्याची

जाणीव झाली. आता माघार घेणे गरजेचे वाटले. पण भिकाजीचा देह शत्रूकडून मिळवायलाच हवा या विचारानेच मराठयांना चेव चढला. मृतदेहाच्या बाजूला असलेल्या राजपूत सैन्यावर मराठे सैन्य तुटून पडले. निकराचा लढा झाला. मराठयांच्या अचानक हल्ल्याला राजपूत उत्तर देऊ शकले नाहीत. तत्परतेने काही मराठे सैनिकांनी भिकाजीचा देह उचलला व 'सर' दरवाज्यातून आत प्रवेश केला. मृतदेह शत्रूपासून मिळवण्यास आलेल्या यशानंतर हळूच मराठयांनी पळ काढला. 'सर'दरवाजा पुन्हा बंद झाला. मोंगल सैन्य वाट पाहण्याशिवाय काहीच करू शकले नाही.

भिकाजीचे कलेवर सदरेवर आणण्यात आले. आता त्यावर अंतिम संस्कार होणे गरजेचे होते. काल मुरारबाजींसारखा अद्वितीय योद्धा धारातीर्थी पडला कोसळला; तर आज भिकाजीसारखा मोहरा गळून पडला. स्वराज्याची अपरिमीत हानी झाली होती. रात्रीची वेळ होती. मराठे मावळयांच्या डोळयांत आसवं उभी राहीली होती. सदरेच्या समोरच चिता रचली गेली होती. सावकाश त्यावर देह रचला गेला व कुंद वातावरणात ओल्या नयनांनी चिता पेटवण्यात आली. नभापर्यंत आगीचे लोळ उडू लागले; आगीच्या लोळांबरोबर जणू नभापर्यंत भिकाजीची किर्ती

पसरली होती. नक्कीच हया पराक्रमाची नोंद देवादिकांनी सुद्धा घेतली असेल. बरोबर दोन दिवसांनी उडत-उडत ही बातमी चिव्हेवाडीच्या वातावरणात मिसळली. ती उडत-उडत तशीच भिकाजीच्या घरापर्यंत पोहोचली. घरात एकच कल्लोळ सुरू झाला. भिकाजीची बायको धाय मोकलून रडत होती. छोटया बाळाला हृदयाला लावून-लावून रडत होती. आता काय करावे हे ही तिला समजत नव्हते. चिव्हेवाडीत एकच रडारड सुरू झाली होती. भिकाजीसह गेलेले अनेक चिव्हेवाडीचे वीर शत्रूशी लढता-लढता वीरगतीला प्राप्त झाले होते. चिव्हेवाडीला मरणाची अवकळा आली होती. वातावरणात दु:ख, सुतक, पसरले होते. परंतु महाराजांच्या स्वराज्यासाठी आपली पोरं, पती गेले याचा ग्रामवासियांना आनंद होता व अभिमानही वाटत होता. भिकाजीची बायकोही आपल्या पतीविषयी अभिमान व्यक्त करत होती. पतीच्या जीवाचे सार्थक झाल्याचा आनंद तिला वाटत होता. तिच्या डोळयांत अश्रू होते व उरात अभिमान फडकत होता. 'धन्य ते भिकाजी व धन्य त्या वीरपत्नी पमा!' पतीच्या कलेवराचे दर्शनही घडले नाही तरी अभिमानाचे लेणे ती लेवून होती. धन्य ती महाराष्ट्र भूमी. जिथे अशा माता-भगिनी व भिकाजी सारखे शूरवीर

जन्मास आले.

दिलेरखानाला भिकाजीच्या मृत्यूची खबर मिळताच तो स्वर्गीय आनंद उपभोगू लागला. त्याला पुरंदरावरचा विजय समीप आल्याची जाणीव झाली. असेच अनेक दिवस पुरंदरच्या 'सर' दरवाजावर मोंगल डोकं आपटीत होते. पण गडावरच्या रामोशी, कोळी, हरिजन मंडळींनी शत्रूला अगदी जीव नकोसा केला होता. ते नामोहरम झाले होते. दिलेरखानाला स्वप्न भंग पावतांना दिसत होते. त्याचा आत्मविश्वास दुणावण्यापेक्षा कमी होतानाच दिसत होता. दोन महिने उलटून गेले तरी किल्ला हातात येणे अशक्यप्राय वाटत होते. दिल्लीहून येतांना मराठयांविषयी, शिवाजीराजांविषयी असलेल्या कल्पना फोल ठरत होत्या. मनातल्या अनेक विचारांना, आकांक्षांना त्याला आवरते घ्यावे लागत होते; पण माघार घेणे म्हणजे साक्षात मरण! आणि माघार घेतो दिलेरखान कसला! तेथेच न थांबता त्याने आपल्या सैन्याला नवीन हल्ले चढवण्याची आज्ञा दिली. नवीन हल्ले चढवले जात होते. तेवढयाच निकराने मराठयांचे उत्तर मिळत होते. इकडे पुरंदरवरचा भयंकर हल्ला! मुरारबाजी, भिकाजी सारखे जबरदस्त शौर्याचे नेते स्वराज्याने गमावले होते. तीनशेपेक्षा जास्त मावळे मृत्यूच्या कवेत विसावले होते. तसेच मराठी मुलुखात (स्वराज्यात)मोंगली

फौजा व अधिका-यांनी नंगानाच चालवला होता. अपरिमीत हानी चालवली होती. गाई-वासरे, बायका-पुरूष धरून नेले जात होते. पिकांवर नांगर फिरवले जात होते. पिके जाळून फस्त केली जात होती. सगळे दैवावर अवलंबून होते. महाराज थोडे चिंतामग्न झाले होते. दररोज येणा-या संतापदायक खबरींनी महाराजांचा दम घुटत होता. आता माघार घेऊन तह करण्याशिवाय राजांना पर्यायच उरला नव्हता. महाराज माघार घ्यायला तयार झाले ते मोंगलांना घाबरून नव्हे. आपल्या स्वर्गमय स्वराज्याच्या रक्षणासाठी, स्त्री-पुरूष, आपल्या जीवा-भावाच्या लोकांचे प्राण वाचावेत म्हणून. हेजीब म्हणून पंतांना मिर्झाराजांकडे पाठवले व मुत्सद्दी अशा पंतांनी राजकारण साधले व लवकरच पुरंदरचा प्रसिद्ध तह झाला. दिलेरखानाला हा तह काही रूचला नाही. त्याला घनघोर अपमान झाल्यासारखेच वाटले. बादशाही कृपेचा जवळ आलेला घास मिर्झाराजांच्या व शिवाजी महाराजांच्या मुसद्दीराजकारणाने हिरावून घेतला होता. दिलेरखान मनातून प्रचंड संतापला होता. वेळ पडल्यास या दोन्ही काफरांना संपवण्याचीच तो मनिषा बाळगून होता. अखेर मिर्झा राजांच्यावतीने 'उदयराज मुनशी' व 'सुरतसिंह कछवा' यांनी महाराजांशी वाटाघाटी केल्या. तहानुसार मोंगलांना या तहात

२३ महत्त्वाचे किल्ले, किल्ल्यांच्या ताब्यातील चार लाख होनांचा प्रदेश मिळाला होता. महाराजांना लहानमोठे मिळून बारा किल्ले व एक लाख होनांचा प्रदेश मिळाला होता. स्वराज्याला चांगलाच झटका बसला होता. पण महाराजांना एकच जाणीव होती, 'सिर सलाम तो पगडी पचास'. माझी माणसं, स्वराज्य टिकले तर असे प्रदेश व किल्ले पुन्हा मिळवता येतील. माझे मुरारबाजी, भिकाजीसारखे जीवाभावाचे खंदे वीर काळाच्या पडदयाआड गेले. स्वराज्याला अशी माणसं गमवावी लागणार असतील तर, त्या स्वराज्याचा खटाटोप कशासाठी? महाराज दु:खी कंठाने अपमानकारक तहाला सामोरे गेले. इतिहासात हा तह पुरंदरचा तह म्हणून प्रसिद्ध झाला. तो दिलेरखान वा मिर्झा राजांच्या मुत्सद्देगिरीमुळे, पराक्रमामुळे नाहीतर शेवटपर्यंत हार न मानणा-या आमच्या थोर मुरारबाजी, भिकाजी, रामोशी, कोळी, हरिजन मावळयांच्या आत्मबलिदानानेच! आजही पुरंदरावर गेल्यानंतर जागो-जागी त्यांच्या स्मृती जागल्याशिवाय राहत नाहीतच.

यानंतर लवकरच बादशहाच्या ५० व्या वाढदिवसाला महाराजांना बोलावले गेले. महाराजांना अडकवून त्यांचा वध करून मराठयांचा राजाच संपवण्याचा घाट बादशहाने घातला

होता. पण शिवाजी राजे चातुर्याने बादशहाच्या हातावर तुरी देऊन राजगडावर परतले. राजगडावर आल्यानंतर महाराजांनी सर्व सेनानींचा, सरदारांचा, मावळयांचा यथोचित सत्कार केला. भिकाजीच्या पत्नीलाही आदराने बोलावले गेले. भिकाजीच्या मुलांना शेला-पागोटे व तलवार देऊन भूषवण्यात आले. पुरंदराजवळची थोडीशी जमीन चोळी-बांगडीसाठी एका भावाकडून म्हणजेच शिवाजी राजांकडून सप्रेम भेट म्हणून भिकाजीच्या पत्नीला दिली. असा आदर्श राजा व आदर्श प्रजा लाभावी हेच स्वराज्याच्या यशाचे गमक होते. अनेक राजे आले व इतिहासजमाही झाले. शिवाजी महाराजही इतिहासात अमर झाले व माझे मराठे मावळेही. अशा आदर्श राजाला व भिकाजी सारख्या माझ्या लाडक्या सेनानींना माझा मानाचा मुजरा!

# ः लेखक परिचय ः


नाव ः श्री दत्तात्रय नाथा भापकर

शिक्षण ः एम . ए . बीएड .

पत्ता ः वारूगड,ता . माण,
पो . श्रीपालवण
जि . सातारा .


साहित्त्य ः १} शिवारातल्या गोष्टी
२} माझ्या कविता
३} बेणं


संपर्क ः ९१७२१३१५३६
९८९२१९६१०२


ः पुरस्कार ः

" शिवकृपा २००८ "राज्यस्तरीय पुरस्कार .

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

टीम ई साहित्य